Peshwas were the chief generals of Maratha army, so they allowed many bankers to come into the field. A large sums were collected as capital organization from various sources. Peshwas started *cumulative* deposit scheme which enable the common people to engage in this new field. The credit transactions were started. The Peshwa took a large amount from various money-lenders. Most of the Brahman Savkars,. who believed in the Peshwas activities took this challenge of the new callings and functioned as Government bankers. Now when the Peshwas became policy makers, administrators, they had golden chances. They functioned as moneychangers, government contractors etc.

The main functions of these bankers were as follows :

(1) **Government Financers :** The bankers supplied a large amount to government in times of emergency without any hesitation or without demanding any guarantee. They went to lakhs of rupees.

(2) **Participation in Government's Functions**
The bankers moved with the generals and provided money to the warleaders e.g. Mr. Wanwale moved with the Peshwa's army. Banker Paranjpe and Kambrus supplied the cloth to the army. Mr. Haribhakti supplied the salaries and wages to the soldiers. Banker Raste supplied other aids to army. They kept musters, used to attend at the battlefield.

(3) They established banks at various places and thus helped to develop that town. They opened branches near the battlefield and thus provided the soldiers the required money and rendered the greatest services to the country. Some of the towns were developed as the result of these bankers' efforts.

(4) They stood as guaranteers for various officials, generals and common people and thus helped to avoid delay in various payments. They charged very small amount for standing as guarantee. Sometimes Rs. 50/- per thousand. If anybody could not provide guarantor he had to deposit a large amount in treasury. In one source of Ghadanibundle

one Kamavisdar seemed to deposit Rs. 25,000/- as he could not give the Guarantor.

(5) They rendered the Hundi (bills of exchange) and thus helped the circulation of commercial currency to promote banking trade and commerce and political activities of the Peshwa Government. They provided commercial paper currency in these days.

(6) Mahal was the unit of collecting the revenue. It was very difficult to collect the revenue in these days as the boundaries changed from time to time. The collection of dues of Mahals were collected by Kamavisdars. They had to advance the anticipated money to government prior to collection of dues. Here it was banker who could afford a large sum of rupees to Kamavisdar. Again the government rendered Vasatas i.e. demand drafts in favour of the Kamavisdars. The Kamavisdar had to pay the amount written in that vasat to the respective person in lieu of his dues. But it was impossible for anybody to pay the amount at a very nick of time, so it became a business of the banker to purchase these vasatas and made payments and he could get that amount conveniently but with interest.

(7) They worked as travel agents. They ran mints, rendered postal services and kept the deposits of the common people and they were thus very useful class of the society.

(8) Every banker employed a shroff to help to change the money and provide the right coins to the right person. There were various types of coins in vogue, some had to change the money for a specific coin, i.e. Potechal was very much in demand. So banking was a profitable business and money could be multiplied in those days. Bankers were respected and honoured by the government. Some of the bankers got the prestigious offices for their monetary help. So everybody was interested in accepting this calling.

Collection of Principle :

They collected money from different sources as it was very

profitable to invest money when they could charge rate of interest from 36% to 48% from the government which invaded the country and acquired dominating position in the country. The money was multiplied by this way.

Previously Maharashtra had joint family system. So these bankers used family funds as capital. Most of them were Kokanastha Brahmins. They had got different callings in those days. Some of them were priests and got much amount from priestly activities as the Peshwa's performed many rituals in those days and offered handful amounts to these priests. Mr. Karve was the family priest of Peshwa who became a great banker later on. Sharangpani invested large amounts and became a rich person.

Some ot them were **Savkars** for generations together while others were Khots in Konkan and this collection of money was their perpetual money. Some of them collected money from relatives, friends and paid it to government. The word "Gujarat" shows that this amount was paid to government through that person and he collected that amount from different sources. Babuji Naik Joshi was the moneylender for generations together. As Krishnaji Naik — his son Sadashiv Naik and his son Babuji Naik. Some of them were working as embassys in other states and all these family funds made them capitalists, bankers. Bankers were not fully devoted to the moneylending business. They were suppliers, brokers, creditors too.

Ghadanibundle 449 gave an extensive account of these. Kapadekari Savakars (cloth merchants-cum-bankers), Bhide, Datar, Oke, Wanawale, Kambawar, Datar, Mahajan, Phadke etc. Most of them were Brahmins. One entry will show the actual picture of this business of the day.

Ghadani 458 — "Govt. purchased from Gopal Keshav Naik (in Khamas Kamasain) Rs. 5,00,000 (5 lakhs) Rs. cloth"

Laxman Naik Chabukswar — From this banker, Peshwa's took the loan and gave to above Gopal Naik for the cloth purchased"

Categories :

(1) Rudimentary moneylenders who settled in villages. Shroffs,

Shetes, Mahajan, Deshmukhs, Market Officials, Deshpandes, Khots.

Bhide Banker was a shopkeeper but later on became the banker of Shahu. Bapuji Naik Joshi was a relative banker general and an officer of the Peshwas. In new expansion plans, he emerged as prestigious banker and became ambitious to become the Peshwa.

Brahmendra Swami was the Guru of the Peshwas but using the alm he lent money to government and other Sardars. He also lent money to Nizam Siddi and others. In Ghadani 448 one gets the account of Rs. 1,13,033. In one year the interest charged by this Guru was 93,000 Rupees for one year. Some of them got the different types of contracts for various supplies.

Haribhakti took the contract of supplies for army services. It was agreed by the banker to supply artillary and made payments to the troop commanders for every month. The amount ran into lakhs of rupees. His money was recovered by the government from the following bankers.

From Shankarji Nike Bhide 25,000
Banker Wanwale 3,00,000
Banker Madhav Ramchandra 2 lakhs 25 thousand.

Some of them were only the cloth merchants. The Gosavis also played a great role in this business.

"Banaras Gir Gosavi, Irakat Gir Gosavi, Anupama Gir Gosavi, Manohar Gir Gosavi sold many articles, paid large amount and got many concessions from the government".

Those who could not offer large amount had also golden chances to become the moneylenders. It was cumulative deposit scheme which started by government to the participation of these common people called as Failavan karj.

Ruppuri Gosavi, Bhavanpuri Gosavi had participated in this type of loans while Anupam Gir Gosavi and Hasgir Gosavi were appointed to recover the dues. He stood guarantor for Janoji Bhosale for lakhs of rupees in 1759*.

By using their position some of the bankers took active part in politics. Babuji Naik wanted to become Peshwa, Brahmendra Swami became the most influential person at the various courts. Gadre took part in politics at the time of Nana Phadnis.

Non-Maharashtrian Bankers

As a general policy of the government to promote the local element to take more opportunities, all the Peshwas gave more chances to Brahman and Marathi bankers on large scale but the bankers from other states were not ready to invest money at the beginning. Trikamseth avoided to pay Rs. 5 thousand to Peshwas*. But later on there seems to be more bankers of other states who participated in this business.

Jateshet, Dullabii, Balashet, Dhanshet, Kane, Nandram etc. There are ample examples of non-Maharashtrian bankers who participated in releasing hundis.** So during this period, Pune became the capital and the resort of the Peshwas, it became the busy places attracted traders, businessmen and bankers. From 1750 to 1815 Pune was the richest city in India. Many businessmen made haste to settle in Poona City. Some of them scrabled to produce new articles during this period. One line of folksong shows this impact

In praise of Pune, I must say that even the cloves are also slender. It was profitable business to bankers. It was profitable business to government. One proverb shows this –

(After moving troops, the debt would be removed").

Bankers and Cloth Market :

One of the effects of flourishing banking was the increase of cloth market in Pune Peth. The government used to provide cloths ration to the defence services in addition to their regular payments. People thought it presitgious to offer the cloth for various occasions. Many embassies and other persons from various courts came to Poona and they were honoured by offering cloth. One entry of Ghadanibundle No. 458 contains that one Malhar Naik Netke got ten thousand rupees from

government to set a cloth shop. Gopal Keshav was also given the same amount for cloth shop.

The banker Chabukswar had paid an amount of Rs. 5 lakhs to cloth merchants in favour of government in the year 1755. This example shows how this business was growing on a large scale. Paranjpe Kambay firm supplied cloth of Rs. 55 thousand to goverent in 1768. There was a constant demand for cloth.

Finance to Government :

For internal collection, government needed bankers to recover the dues in time. For collection of tribute from other courts also the government needed bankers to stand as the guarantees between the two parties.

War Finance

In 18th century, the Peshwas and other Sardars organized many expeditions. The government had to raise the large number of troops, so the government needed many a bankers to pay the amounts for investing in this programme.

The Rate of Interest

The rate of interest was 2% to 4% per mensem. Government borrowed the large amounts at highest rates. In the private sector also the same rate of interest was charged. Some additional charges were charged as Manoti to the borrower. The rate was dependent on the person who wanted to borrow loan. If they keep some land, property or ornaments as Mortgage, there was less rate of interest. The moneylender used to deduct some amount if the borrower repaid the amount in time but this condition was always included in agreement.

Recoveries of Loan

The debt and its recoveries were also taken as Moral binding. The pressure of the society made the borrower to recover the amount as early as possible. It was believed that if the debtor did not recover his dues he had to enter into hail for repayment.

Karj Chauthai

When government assisted to recover the dues, the 1/4 of the amount recovered was taken by government for recovery charges.

Dharane

Sometimes they used Dharane, Brahman was appointed by the banker. He started sitting outside the residence of the borrower and harassed him.

Tyag

It was the more serious way for recovery. The moneylender or his agent started fasting till the money was recovered. If the amount was not paid in time, the moneylender used to charge an enhanced rate of interest.

The bankers could not survive in the new situation especially they could not cope-up with the new situation under Alien rule. They could not confront the new challenges.

Prof. (Mrs.) Sarala G. Deshpande
Abasaheb Garware College,
Pune - 411 004 (M.S.)

* Ghadani Daftar 449.
** Peshwa Daftar Vol. 23, letter 92.

* Selections for New Research (   )
** Rumal one Paper No. 192.
Returnable private papers of Nana Phadnis.
Pune Archives, Pune - 1.

विठ्ठल सुंदर परशरामी

प्रा. डॉ. ग. का. माने

मराठ्यांच्या इतिहासात साडेतीन शहाण्यांत नागपूरचा दिवाकरपंत, सखाराम बापू, विठ्ठल सुंदर आणि अर्धा शहाणा म्हणून नाना फडणविसाचा समावेश करण्यात आला. यांपैकी विठ्ठल सुंदरविषयी माहिती अल्पस्वल्प आहे. नव्हे इतिहासकारांनी त्याच्या कार्याची फारशी दखल घेतली नाही. विठ्ठल सुंदरच्या व्यक्तिमत्त्वाची नोंद व्हावी यासाठीच या लेखाचे प्रयोजन आहे.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा असा, की या त्रयीस शहाणे ठरविण्यात आले, परंतु ते कोणत्या निकषावर हे अजूनही खऱ्या अर्थाने ज्ञात नाही. तरी त्यांच्या एकंदर कर्तृत्वाचे मूल्यमापन करून ठरविले गेले असावे. नाना फडणविसाला लढाईचे ज्ञान नसल्यामुळे तो केवळ मुत्सद्दी म्हणूनच त्यांना अर्धा शहाणा ठरविले आहे. या त्रयीस 'सख्या देवा विठ्ठला' असेही म्हटले जात होते.[1]

विठ्ठल सुंदर हा देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण. मूळचा अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेरचा राहणारा असून त्याचे आडनाव परशुरामी होते. प्रथम तो नानासाहेब पेशव्यांकडे नोकर होता. परंतु नानाने त्याचा अपमान केल्यामुळे विठ्ठल सुंदरने निजामशाहीच्या पदरी नोकरी पत्करली. रामदासपंताच्या मर्जीमुळेच निजामअलीकडे त्याचा प्रवेश झाला व त्याने कारकुनाची नोकरी पत्करली. निजामअलीस हैदराबादची गादी मिळविण्याचे कामी याचा फार मोठा उपयोग झाला; म्हणूनच इ. स. १७६२ मध्ये सलाबतजंगास कैद करून निजामअलीने याला आपल्या पदरी दिवाणाची जागा दिली. अशीही एक आख्यायिका आहे, की सकलकले म्हणून कोणी प्रसिद्ध ज्योतिषी जळगाव जामोदच्या बाजूस राहात होता. त्याचेकडून मुहूर्त पाहून विठ्ठल सुंदर हैदराबादेस गेला. पुढे तो उच्च पदावर विराजमान झाल्यावर सकलकले यांच्याशी कृतज्ञ बुद्धीने वागे.[2]

विठ्ठल सुंदरच्या एकंदर कामगिरीचे मूल्यमापन पुढील लढायांच्या विवरणात

आढळून येते. त्यांचा क्रमवार उल्लेख करणे अगत्याचे आहे.

सिद्धखेडचे युद्ध[३] १७५७-५८

निजाम आणि पेशवा यांच्या सत्तेचा विचार केला तर त्यांच्यात सत्तासंघर्ष हा दोन सत्तांच्याच टोकावर तोलला गेला आहे. दिल्लीच्या सत्ताधिकाऱ्याने निजामाला तंबी देण्यासाठी मराठ्यांना विनवायचे तर दुसरीकडे मराठे जड होताच निजामाला जवळ करायचे, त्यामुळे या संघर्षातून निजाम-मराठे यांत अनेकदा तडजोडी झाल्यात. परंतु मराठे इतरत्र गुंतले असताना निजामाने आपले डोके वर उचलल्याचे दिसून येते. या सत्तासंघर्षातून अनेकदा युद्धे झाली.

पेशव्यांनी २५ लाखांचा प्रदेश मागितल्यामुळे निजामअली पेचात पडला. एकतर सलाबतजंगाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. पेशव्यांच्या २५ लाखांच्या मुलूख मागणीत गोदावरीचा प्रदेश, दौलताबाद व अंतूर किल्ले यांचा अंतर्भाव होता. शहानवाजखानास जहागिरी द्यावी अशी मागणी होती. परंतु निजामअली, विठ्ठल सुंदर आणि इब्राहिमखान यांनी मागणीला विरोध करून खंडणी आणि प्रदेश देण्यापेक्षा त्याद्वारे सैन्याची उभारणी करावी असा निश्चय केला. विठ्ठल सुंदरने पैशाची चणचण दूर करण्यासाठी बाळापूरवर स्वारी करून २ लाख रुपये आणले व सैन्याचा थकलेला पगार चुकता केला. एवढे सारे करूनही पेशव्यांपुढे टिकाव लागणे शक्य नव्हते. दत्ताजी शिंदे आणि विश्वासराव यांनी सिद्धखेडच्या लढाईत निजामाचा पराभव केला. शेवटी विठ्ठल सुंदरने वाटाघाटी करून २५ लाखांचा मुलूख पेशव्यांच्या स्वाधीन केला.

लढाईनंतर निजामअलीला दौलताबाद किल्ल्यातच अटकेत ठेवावे, असा सुगावा लागल्यामुळे निजामअलीने हैदरजंगास भेटीला बोलावून मारेकऱ्याकरवी त्याचाच खून करविला. या खुनामागे विठ्ठल सुंदरचा हात असावा, कारण असे की, हैदरजंगाचे लोक जेव्हा निजामअलीवर चालून आले तेव्हा या लोकांपासून विठ्ठल सुंदरने निजामअलीचे रक्षण करून त्याला सुरक्षित जागी पोहोचविले.

उपरोक्त मतासाठी सनपूरच्या बखरीतील उताऱ्याचा उल्लेख करावा लागेल. तो येणेप्रमाणे—

"विठ्ठल सुंदर यांणी जाऊन अलीखाँ यांचा निरोप जाणजी निंबाळकर यास सांगितला. त्याजवरून निंबाळकर यांणी सांगितले की तुम्ही मालीकच आहात. उमेद धरा म्हणजे सहजात पारपत्य होईल. परंतु मजकूर फुट्ट न द्यावा. आणि हिंमत असू द्यावी. येका दोन दिवसा खिडकर निंबाळकर व सलगे (सगळे!) पांढरे व छोटे मोठे मुसलमान अवघे माझे सल्हेत आहेत त्याचे अन्न घेऊन अवघे सरदार मी आपले मकानावर बोलावितो. तुम्हास सूचना पाठवू. तेव्हा तुम्ही येणे म्हणजे अवघ्या कडून रूबकार बचेण तुम्हास देवितो. येक जाधोराव आम्हासी त्यासी वाकडे आहे.[४]"

सत्तेच्या भांडणात विठ्ठल सुंदरची कल्पकता दिसून येते. विठ्ठल सुंदर हाच खरा हैदरजंगच्या खुनास कारणीभूत आहे. या बखरीत विठ्ठल सुंदरच्या हालचालीचे वर्णन आहे. या खुनानंतर विठ्ठल सुंदर 'प्रतापवंत' होतो व जानोजीच्या दरबारात याचा मान वाढतो [५]

उद्‌गीरचे युद्ध[६] जानेवारी १७६० ते मार्च १७६०

साखरखेडच्या तहानंतर पेशव्यांना ठरलेली जहागिरी दिली नाही. त्यामुळे पेशवे निजामअलीवर रुष्ट होते. शेवटी युद्धाशिवाय निजामअली रस्त्यावर येणार नाही, हे लक्षात घेऊन पेशव्यांनी बीदरजवळील उद्‌गीर येथे निजामअलीवर चाल केली. इब्राहिमखानच्या तोफखान्यापुढे निजामाचा निभाव लागला नाही.

शेवटी विठ्ठल सुंदरने मध्यस्थी करून ६० लाखांची जहागिरी, विजापूर व बऱ्हाणपूर प्रदेश आणि आशिरगड व दौलताबाद किल्ले द्यावे असे ठरविण्यात आले. निजामाच्या अधिक्षेत्राखाली हैदराबाद व विजापूर हे दोनच सुभे होते. त्यावरही मराठ्यांनी चौथाई लागू केली होती.

या तहात विठ्ठल सुंदरची कूटनीती दिसून येते. सरदेसाई लिहितात, "प्रथम ४५ लाखांचा प्रदेश देण्याचे ठरले होते पण मागाहून सदाशिवरावने आणखी १५ लाख वाढविले. हे जास्ती वाढविण्याचे कारण सदाशिवराव लिहितो. विठ्ठल सुंदरास बडतर्फ करावे अशी मागणी केली. त्यावर विठ्ठल सुंदरनी वजीद होवून कळविले मी सर्व प्रकारे पदरचा आहे. कृपा करावी चाकरी करून दाखवीन, निष्ठेने वर्तणूक करीन. तेव्हा ती गोष्ट मान्य करून १५ लाखाची जागीर वाढविली व दौलताबाद किल्ला घेतला. विठ्ठलपंतांनी निजामअली खानापाशी राहून आमचे मर्जीप्रमाणे वर्तणूक करावी, तिळमात्र अंतर पडू देवू नये. याप्रमाणे शपथपूर्वक केले. परंतु निजामअली व विठ्ठल सुंदरच्या आणाभाका किती खऱ्या होत्या हे पुढील इतिहासावरून कळते. शेवटी मराठ्यांना हक्कासाठी परत युद्ध करावे लागले."[७]

यानंतर मराठ्यांच्या इतिहासात ज्या घटना घडल्या त्या दुर्दैवीच म्हणाव्या लागतील. पानिपतच्या लढाईत तर मराठ्यांची एक पिढी गारद झाली. नानावर पुत्र आणि बंधू यांच्या वियोगाचे दुःख कोसळल्यामुळे मृत्यूला सामोरे जावे लागले. अल्पवयीन माधवरावावर स्वराज्याची धुरा सांभाळण्याची कामगिरी आली. परंतु राघोबादादाच्या गृहकलहामुळे माधवरावाच्या आक्रमक वृत्तीला आळा बसला. या संधीचा फायदा घेऊन निजामअलीने पेशव्यांवर स्वारी केली. परंतु उरळी येथे निजामाचाच पराभव झाला. शेवटी विठ्ठल सुंदरने राघोबादादाचा फायदा घेऊन पेशव्यांना ४० लाख मुलूख तोडून दिला.

निजामअली हा काही काळ वऱ्हाडच्या सुभेदारपदावर होता. तेव्हा तेथे भवानीपंत

आग्रा वाशिमकर व मोरो श्रीधर यांनी निजामअलीच्या हाताखाली काम केले. त्याचा मदतनीस म्हणून भवानी पंडीत काम करीत होता. पुढे तो कामानिमित्त हैदराबादेला गेला. परंतु विठ्ठल सुंदर यांच्याशी त्याचे न पटल्यामुळे निजामअलीची नोकरी सोडून तो वऱ्हाडात आला. हा काळ इ. स. १७६०च्या दरम्यानचा असावा असे वाटते.[८]

विठ्ठल सुंदरने राघोबादादाच्या दुटप्पी धोरणाचा फायदा घेऊन निजामअलीच्या साहाय्याने पेशवाई कमकुवत करण्यास मागेपुढे पाहिले नाही. यासाठी त्याने जानोजी भोसल्याच्या हस्ते मराठ्यांनी राज्यकारभार करावा व पेशव्यांना हुसकावून लावावे अशी योजना केली होती. पेशवाईतील असंतुष्ट मराठ्यांना आपला व्याही रामजी मुतालिक यांच्या मार्फत प्रतिनिधीस व गोपाळराव पटवर्धन, मोरो फडणवीस, सदाशिव रामचंद्र शेणवी इत्यादींना फितूर केले. यांच्याच साहाय्याने १७६३च्या मे महिन्यात पुणे लुटून उद्ध्वस्त केले.

पुढे नागपूरकर भोसले प्रबळ होऊ नये म्हणून त्यांना प्रतिस्पर्धी म्हणून विठ्ठल सुंदरने कोल्हापूरच्या भोसल्याशी राजकारण चालविले. यावरून त्याच्या बुद्धिचातुर्याची चुणूक दिसून येते.

राक्षसभुवनाचे युद्ध[९] १०-८-१७६३

मराठ्यांच्या गृहकलहाचा फायदा घेऊन विठ्ठल सुंदरने पराभवाचे उट्टे काढण्याचे निश्चित केले. राघोबादादाने माधवरावास अटकेत ठेवून त्यांच्या बाजूस असलेल्या सरदारांना राघोबादादाने त्रास देण्यास सुरुवात केली. गोपाळराव पटवर्धनांवर हल्ला करून मिरजेचा किल्ला ताब्यात घेतला. शेवटी गोपाळराव निजामशाहीच्या आश्रयाला गेले. विठ्ठल सुंदरने जानोजी भोसल्यास छत्रपतिपदाची लालसा दाखवून ६०-४० चा तह देवाजी पंताच्या मदतीने घडवून आणला. तसेच दादाविरुद्ध रुष्ट झालेले भवानराव प्रतिनिधी, यमाजी शिवदेवाचा मुलगा गमाजी बाबा (याचे नाव सदाशिव यमाजी हा विठ्ठल सुदरचा व्याही), पिराजी नाईक निंबाळकर यांना विठ्ठल सुंदरने बहुमान करून त्यांना ठेवून घेतले व मदत देण्याचे कबूल केले. यमाजीच्या मार्फत कोल्हापूरकर शिवाजीशी संधान बांधले. एकंदर सर्वच परिस्थिती मराठ्यांच्या विरोधात गेली होती.

परंतु मल्हारराव होळकराने आपल्या कूटनीतीचा तसेच दंडुक्याचा उपयोग करून मराठे सरदारांना निजामाकडून परत आणले. शिवाय नागपूरकर भोसलेही ६०-४० च्या तहातून बाहेर पडले.

जानोजी भोसल्याचा निरोप येताच पेशव्यांनी १० ऑगस्ट १७६३ रोजी विठ्ठल सुंदरच्या फौजेवर गोदातटी राक्षसभुवनावर हल्ला केला. एकदा तर राघोबादादाचा हत्ती वेढला गेला. परंतु माधवरावच्या चौकस धोरणामुळे राघोबांची सुटका झाली. घनघोर युद्ध होऊन विठ्ठल सुंदरच्या सैन्याचा बिमोड झाला. स्वतः विठ्ठल सुंदर, राजे

विनायकदास व खंदारचा राजा गोपाळसिंग हे मारले गेले. निजामअलीने या युद्धाची संपूर्ण जबाबदारी विठ्ठल सुंदरवर टाकली.

या लढाईत विठ्ठल सुंदरचा मृत्यू घडला नसता तर निजाम-मराठ्यांच्या संबंधांना वेगळे वळण लागले असते. सनपुरीच्या बखरीत या लढाईचा उल्लेख आहे. त्यानुसार मुरादखानाच्या फितुरीची आपल्याला कल्पना येते.

" सुभेदार यांनी आपला वकील नबाबाचे लष्करात पाठविला. त्याणी मुरादखा पाच हजार फौजेचा सरदार होता. त्याची भेट घेऊन फितूर केला, पाच लाख रुपये विठ्ठल सुंदर याचे डोकसे मारिले म्हणजे द्यावे ऐसा करार मुरादखांने सांगितले.[१०] "

अशा प्रकारच्या फितुरीची नोंद अन्यत्र नाही. या कारस्थानात पेशव्यांची भूमिका नेमकी कोणती हे नक्की सांगता येत नाही. तरी विठ्ठल सुंदर फितुरीमुळे बळी पडला हे सत्य आहे. राक्षसभुवनाच्या लढाईच्या यशासाठी माधवरावाचे कर्तृत्व जसे कारणीभूत ठरले तसेच विठ्ठल सुंदरच्या मृत्यूस वरील कारस्थान कारणीभूत आहे."

सारांश : विठ्ठल सुंदरच्या कर्तृत्वाची चुणूक निजामअलीचे रूपांतर करण्यात दिसून येते. त्याच्या जीवनकाळात चारदा पेशव्यांविरुद्ध युद्ध करून एकदाही विजय मिळविता आला नाही. परंतु वेळ काढून नेण्यासाठी व निजामअलीवर नामुष्कीची पाळी येऊ नये म्हणूनच तहाचा स्वीकार केला परंतु त्यांनी कधीही तहाचा त्याग केले नाही. हा मोठा बुद्धिमान व महत्त्वाकांक्षी होता. विठ्ठलपंतास राजाबा[illegible] व [illegible] हे किताब मिळाले असून निजामशाहीत त्याची जहागिरी 'गणेश' या नावे[illegible] ओळखली जाते. आजही विठ्ठल सुंदरचे घराणे 'राजा गणेश' या नावाने हैदराबादला प्रसिद्ध आहे.

संदर्भ सूची

(१) काळे, या. मा., '**नागपूर प्रांताचा इतिहास**' (१९३४), पृ. १४०

(२) केतकर, श्रीधर व्यंकटेश आणि इतर, '**महाराष्ट्रीय ज्ञानकोश**', भाग–२०, (१९२६) पृ. २१२–१३; संपा. दाते, य. रा., व कर्वे, **सुलभ विश्वकोष**, भाग–५, (१९५०), पृ. २३१०

(३) सरदेसाई, गो. स., **मराठी रियासत**, ६ (१९५३), पृ. ११०

(४) जोशी, र. मो., **सनपुरी बखर**, (१९४९), पृ. २६

(५) पेशवे दप्तर खंड–२३, पत्र क्रमांक ९०, पृ. ६८

(६) इगळे, राम, " विठ्ठल सुंदर (एक शहाणा) " पुसद येथील इतिहास परिषद (१९८६)

(७) सरदेसाई, गो. स. **पूर्वोक्त**, पृ. १३२

(८) संपा. जोशी, द. पं.; **पंचधारा**, वर्ष २९, अंक–९. एप्रिल–मे–जून (१९८६), पृ. १०३

(९) काळे, या. म., **पूर्वोक्त**, पृ. १५३; सरदेसाई, गो. स.; **पूर्वोक्त**, पृ. १५४, **सनपुरी बखर**, पृ. २९–३०

(१०) सनपुरी बखर, पृ. ३०

(११) जोशी, द. पं. "सनपुरीची बखर ऐतिहासिक उकल" उस्मानिया युनिव्हर्सिटी जर्नल, भाग–३, मार्च १९६८, पृ. २६

विनायकदास व खंदारचा राजा गोपाळसिंग हे मारले गेले. निजामअलीने या युद्धाची संपूर्ण जबाबदारी विठ्ठल सुंदरवर टाकली.

या लढाईत विठ्ठल सुंदरचा मृत्यू घडला नसता तर निजाम-मराठ्यांच्या संबंधांना वेगळे वळण लागले असते. सनपुरीच्या बखरीत या लढाईचा उल्लेख आहे. त्यानुसार मुरादखानाच्या फितुरीची आपल्याला कल्पना येते.

" सुभेदार यांनी आपला वकील नबाबाचे लष्करात पाठविला. त्याणी मुरादखा पाच हजार फौजेचा सरदार होता. त्याची भेट घेऊन फितूर केला, पाच लाख रुपये विठ्ठल सुंदर याचे डोकसे मारिले म्हणजे द्यावे ऐसा करार मुरादखांने सांगितले.[10] "

अशा प्रकारच्या फितुरीची नोंद अन्यत्र नाही. या कारस्थानात पेशव्यांची भूमिका नेमकी कोणती हे नक्की सांगता येत नाही. तरी विठ्ठल सुंदर फितुरीमुळे बळी पडला हे सत्य आहे. राक्षसभुवनाच्या लढाईच्या यशासाठी माधवरावाचे कर्तृत्व जसे कारणीभूत ठरले तसेच विठ्ठल सुंदरच्या मृत्यूस वरील कारस्थान कारणीभूत आहे.[11]

सारांश : विठ्ठल सुंदरच्या कर्तृत्वाची चुणूक निजामअलीचे रूपांतर करण्यात दिसून येते. त्याच्या जीवनकाळात चारदा पेशव्यांविरुद्ध युद्ध करून एकदाही विजय मिळविता आला नाही. परंतु वेळ काढून नेण्यासाठी व निजामअलीवर नामुष्कीची पाळी येऊ नये म्हणूनच तहाचा स्वीकार केला परंतु त्यांनी कधीही [illegible]ांनी त्या[illegible] केले नाही. हा मोठा बुद्धिमान व महत्त्वाकांक्षी होता. विठ्ठलपंतास राज[illegible]हादूर व [illegible] हे किताब मिळाले असून निजामशाहीत त्याची जहागिरी 'गणेश' या नावाने ओळखली जाते. आजही विठ्ठल सुंदरचे घराणे 'राजा गणेश' या नावाने हैदराबादला प्रसिद्ध आहे.

संदर्भ सूची

(१) काळे, या. मा., '**नागपूर प्रांताचा इतिहास**' (१९३४), पृ. १४०

(२) केतकर, श्रीधर व्यंकटेश आणि इतर, '**महाराष्ट्रीय ज्ञानकोश**', भाग–२०, (१९२६) पृ. २१२–१३; संपा. दाते, य. रा., व कर्वे, **सुलभ विश्वकोष**, भाग–५, (१९५०), पृ. २३१०

(३) सरदेसाई, गो. स., **मराठी रियासत**, ६ (१९५३), पृ. ११०

(४) जोशी, र. मो., **सनपुरी बखर**, (१९४९), पृ. २६

(५) पेशवे दप्तर खंड–२३, पत्र क्रमांक ९०, पृ. ६८

(६) इगळे, राम, " विठ्ठल सुंदर (एक शहाणा) " पुसद येथील इतिहास परिषद (१९८६)

(७) सरदेसाई, गो. स. **पूर्वोक्त**, पृ. १३२

(८) संपा. जोशी, द. पं.; **पंचधारा**, वर्ष २९, अंक–९. एप्रिल–मे–जून (१९८६), पृ. १०३

(९) काळे, या. म., **पूर्वोक्त**, पृ. १५३; सरदेसाई, गो. स.; **पूर्वोक्त**, पृ. १५४, **सनपुरी बखर**, पृ. २९–३०

(१०) सनपुरी बखर, पृ. ३०

(११) जोशी, द. पं. "सनपुरीची बखर ऐतिहासिक उकल" उस्मानिया युनिव्हर्सिटी जर्नल, भाग–३, मार्च १९६८, पृ. २६

शिवकालीन नाणी व मापे

के. डी. ढेकणे

शिवाजीची सोन्याची नाणी प्रथमतः लोकांमध्ये आणण्याचा मान वेस्टर्न सर्कलच्या आर्कऑलॉजीच्या खात्याला दिला पाहिजे. ह्या खात्याने १९१८–१९ च्या प्रगती अहवालात होनाची माहिती दिलेली आहे. शिवाजीच्या राज्यात स्वतःच्या नाण्याबरोबरच सर्व परराज्यांतील नाणीही व्यवहारात होती. नाना प्रकारची नाना नाणी शिवकालात प्रचलित होती. काही तांब्याची, काही रुप्याची तर सोन्याची नाणी कमीअधिक प्रमाणातून होती. सध्या भारत इतिहास संशोधन मंडळात एकूण ४४ नाणी शिवकालातील व पेशवेकालातील आहेत. सभासद सांगतो शिवाजी महाराजांनी आपल्या जवळील नाण्यांची मोजदाद केली : त्यात १०,००० गंबार, मोहरा दोन लक्ष, पुतळया तीन लक्ष, पातशाही होन १३ लक्ष ६४ हजार ५२५, सनगरी होन १२,७४,६५३, अच्युतराई होन २,५४,०३०, देवराई होन ३,००,४५०, रामचंदाई होन १,००,४००, गुती होन १,००,०००, धारवाडी होन, २,००,०००, सतलाम्या १ लक्ष, शंभराच्या १ लक्ष, शिवराई होन ४ लक्ष, कावेरीपाक होन १५,००,०००, मलमघाटी होन २,००,०००, नाईकी होन १ लक्ष, आटवणी होन ३ लक्ष, जडमाल होन ५,००,०००, ताडपत्री होन १,४०,००० तर फलम नाण्याची संख्या ३ लक्ष होती. फलम हे सोन्याचे नाणे होते. वरील नण्यांव्यतिरिक्त अफराजी, बिलघरी, वेकंटराई, त्रिवाळुरी, उलफकरी, देवनहाली, विसुळी, महमदशाई, रामनाथपुरी, चंदावरी, बेळुरी व कुनगोटी इ. होनांची देवाणघेवाण व्यवहारात होत असे.

सोन्याच्या नाण्यात गंबार, मोहर, पुतळी, सणगरी, शिवराई, पातशाही, देवराई, अच्युतराई, रामचंदाई, शंभराच्या, धारवाडी, गुती, सतराम्या, कावेरीपाक, पाकत्रिसुळी, उलफकरी, रेवनहली, चंदावरी, रामनाथपुरी, मुहमदशाई, देळुरी, कुनगोटी

इ. ३२ सोन्याची नाणी होती. त्यांचा शिवकालात व्यवहारात उपयोग केला जाई. मोहर हे नाणे सहसा राजांना किंवा सन्माननीय व्यक्तींना बक्षिसादाखल, नजराण्यादाखल दिले जाई, तर पुतळी याचा उपयोग दागदागिने बनविण्यासाठी करत. डॉ. सेनच्या मते गंबार हे नाणे गल्बर या नावाने ओळखले पाहिजे. सन १७६३ मध्ये मुंबईत त्याची किंमत ३ रु. १२ आणे होती. अच्युतराई, देवराई ही नाणी त्या त्या राजांच्या नावावरून पडली तर धारवाडी, चंदावरी, देळुरी, रामनाथपुरी त्या त्या ठिकाणी पाडली जात. त्यामुळे त्यांना गावची शहराची नावे पडली. पादशाही, मुहमदशाही होन ही विजापूरच्या मुसलमान राज्यकर्त्यांनी पाडली. निसाणी सोन्याचे नाणे निसाणी नावाच्या व्यक्तीने स्वतःच्या जबाबदारीवर पाडले. फलम हे सोन्याचे नाणे. दाभाड्याच्या दप्तरामधून आपणास फलम या नाण्यासंबंधी विस्ताराने माहिती मिळू शकेल. त्यांनी चक्रम, होन व फलमचे कोष्टक दिले आहे. १००० होन = १६० छत्रपती चक्रम तर १ होन = १६ फलम व १ चक्रम = १० फलम असा उल्लेख दाभाड्याच्या तत्कालीन कागदपत्रात सापडतो.

शिवराई हे नाणे शिवरायांनी स्वतःच्या नावाने सुरू केले. शिवराई होनावर एका बाजूस "श्री राजा शिव" व दुसऱ्या बाजूस "छत्रपति" हे शब्द दिसून येतात. पुतळ्या व होनावरही "राजा श्री शिव छत्रपती" अशी अक्षरे असायची. दत्तो वामन पोतदार यांना शिवाजी महाराजांचा होन मिळाला. "त्याचे वजन ३ मासे ४ गुंजा असून शिखरशिंगनापूरचा महादेव व तुळजा भवानी मातेची प्रतिमा शिवाजीने त्यावर काढल्या असाव्यात असे त्यांचे म्हणणे." राज्यव्यवहारकोशात होन, प्रताप, धरण, रुपया, वराह, चवल, दुबल, मोहरा, सुवर्णनिष्क, रजतनिष्क, लाहुरी व पण इ.नाण्यांचा उल्लेख आढळतो. वराह, होन, प्रताप, धरण, चवल, दुबल, फलम इ. सोन्याच्या नाण्यांचा उल्लेख आहे. राज्यव्यवहाराकोशातील नाण्यासंबंधी १ वराह = १ होन, (१ होन ३ वा ४ रु. किंमतीचा असे) "१ होन = २ प्रताप, २ प्रताप=४ धरण, ४ धरण = ८ चवल, ८ चवल = १६ दुवाल वा दुगल, १ फलम = १ पण व १६ दुगल = ३२ फल वा फलम" असे हे कोष्टक.

चांदीच्या नाण्यात रुपया, लारी, टका इ.चा समावेश शहाजहानी व आलमीगरी या नावाचे चांदीचे रुपये व्यवहारात होते. तर मुहमदी या चांदीच्या नाण्याचा उल्लेख फ्रामर करतो. तत्कालीन कागदपत्रांवरून लहारी किंवा लारी हे चांदीचे नाणे प्रथम पर्शियन व्यापाऱ्याने व्यवहारात आणले, तेही कोकणामध्ये. हे नाणे चांगल्या व उत्तम प्रतीच्या चांदीपासून बनविलेले असे. विजापूरच्या सुलतानाकडून सदरहू नाण्याला मागणी होती. कदाचित स्वतःच्या नावाने लारी नाणे पाडण्याचा विचार असावा. लारीज या नाण्याचा उल्लेख "कोकणातील कागदपत्रा"वरून दिसून येईल. चौल, वसारा, दाभोरी लारी शिवरायांच्या खजिन्यात होत्या टक्का हे चांदीचे नाणे त्या काळी

व्यवहारात होते. १२ टक्क्याचा १ सोन्याचा होन बनला जाई, असा उल्लेख एका ठिकाणी आढळतो. तर १ होन हा १०$\frac{१}{८}$, १२$\frac{१}{२}$, १३ टक्क्याबरोबर असे असाही उल्लेख आढळतो. " रुपया " हे चांदीचे नाणे मोठे होते. त्याचे वजन एक तोळयाच्या जवळपास असे. अब्बासी नाणे शहा अबास दुसरा याच्या नावावरून अबासी हे नाणे सुरू झाले. अबसाली म्हणजे पर्शियन नाणे अबासी. टॅव्हरनियर म्हणतो अबासी नाणे सुरतेमध्ये सर्रास वापरले जात असे. रुपये, आसफर्या, अबासी, दाभोळी कबरी (लाहारी) चुली, कबरी व बसरी कबरी अशी ही चांदीची नाणी शिवकालात होती. लाहारीचे कोकणात मोठ्या प्रमाणात व्यवहार होत असे. जकातीवर मालकाची किंमत यासाठी लाहारी या नाण्याचा उपयोग कोकण पट्टीवर केला जात असे.

तांब्याच्या नाण्यात शिवराई किंवा छत्रपती, सजगणी, त्रिरूका, पैसा, एका, दाम, अडका, जितल इ. नाण्यांचा समावेश. ३ टक्याचा १ त्रिसका, तार, २ त्रिसक्याचा ८ छत्रपती किंवा शिवराई नाणे बनत असे. २ त्रिसका=१ सजगणी नाणे. (छत्रपती= १ टक्का किंवा ४८ सके बनत.) ६ रुक्याचा$\frac{१}{२}$ आणा, ४ पैशाचा १ टका, तर १६ टकाचा = १ रु. अडका म्हणजे $\frac{१}{२}$ पै, पैसा, पाव आणा तर ३ रुका=१ पैसा. ३–४ टका = १ रु. व ३ ते ४ रु. = १ होन. अशी ही किंमत. वरील सर्व लहानात लहान अशा नाण्याची देवाणघेवाण व्यवहारात होत असे. बुकरूक व बुडगोक ह्या तांब्याच्या नाण्याचा उल्लेख ऐतिहासिक फारसी साहित्यात सापडतो. पैसा, डबु ही तांब्याची शिवकालीन नाणी. पैसा = १० मासा = १०/१२ तोळा तांबे. तर १ डबु = २ पैसा = २२ मासा. इंग्रज, डच, पोर्तुगीज पॅगोडा ह्या नाण्याचा उपयोग करीत. सध्या भारत इतिहास संशोधन मंडळात तांब्याची ७ नाणी असून त्याच्यावर श्री राजा शिव, श्री राजाराम, श्री छत्रपति, छत्रपति अशी अक्षरे आहेत. रुप्याच्या नाण्याचा व्यवहारही शिवकालीन होत असे.

शिवराई, होन हे नाणे शिवरायांनी स्वतः पाडले. होनू हा कन्नड शब्द त्यापासून होन. शिवराई या सोन्याचे नाण्याचे वजन दोन मासा व ७ गुंज इतके तर काहींच्या मते त्याचे वजन ३$\frac{१}{२}$ मासा. १ मासा = १/१२ तोळा असा उल्लेख. प्रत्येक होनमध्ये २$\frac{३}{४}$ मासा व $\frac{१}{२}$ गुंज इतके सोने आणि ५$\frac{१}{२}$ गुंज चांदीचा समावेश असे. शिवरायांनी इ. स. १६७४ मध्ये रायगडावर टांकसाळ चालू केली. त्या काळात सोनाराच्या, सावकाराच्या स्वतंत्र टांकसाळी असत. नाणी पाडण्याचे काम ते स्वतःच्या जबाबदारीवर करत. सरकार त्यांच्याकडून काही कर टांकसाळीसंबंधी वसूल करत असे. शिवरायापूर्वी मुद्रा फारसी किंवा अरबी भाषेत असायची. मात्र छत्रपती शिवाजींनी आपली स्वतःची राजमुद्रा नागरी लिपीत तयार केली; ती ही संस्कृत भाषेत.

" प्रतिपच्चन्द्रलेखेव वर्धिष्णु विश्ववन्दितः "
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥ "

एका राज्यातील नाणे दुसऱ्या राज्यात चालत असे. परंतु सर्वच नाणी सारख्या दर्जाची व कसाची नसल्यामुळे ती पारखणारे सराफ असत. ते त्याचे बाजारभाव ठरवीत.

इंग्रजसुद्धा नाणी पाडीत ती सुबक असत. त्यांनी जेव्हा सुरतेहून मुंबईस वखार नेली तेव्हा सुरतेच्या नाण्यासारखी सोने, तांबे, रुपे यांची नाणी पाडण्याचे ठरविले. तत्संबंधी इंग्लंडास मुंबईचे इंग्रज अधिकारी लिहितात, "सोने, रुपे, तांबे या धातूची नाणी सुरतेच्या नाण्याप्रमाणेच करण्याचे आम्ही ठरविले. तसे केले म्हणजे ती शेजारच्या पोर्तुगीजाच्या देशात, शिवाजीच्या मुलखात आणि दक्षिणेतही अप्रतिबंध वापरली जाऊन बेटावरील व्यापाराला फार सोयीचे होईल."

२३ डिसेंबर १६७४ रोजी मुंबईहून सुरतेस एक पत्र इंग्रजांनी पाठविले : "मुंबईचा पैसा शिवाजीच्या मुलखात चालतो. विलायतेहून १५०० तांब्याच्या पेट्या आल्या आहेत. त्या मेखे टांकसाळीकरिता आम्ही उतरून घेतो. कारण आमचा पैसा शिवाजीच्या मुलखात चालतो असे नसून पोर्तुगीज मुलुखात सुद्धा चालतो."

शिवकालात चलनी व्यवहार होन, लारी, सके, टके, खुर्दा रुपये मोहरा या नाण्या-मार्फत चालत असे. लारी या नाण्याचा व्यवहार विशेषतः कोकणात चालत असे. त्याचे देशावर प्रमाण कमी होते. शिवाजीच्या खजिन्यात जी नाणी होती, ती एकट्या महाराष्ट्रात चालणारी नसून परराज्यात, भारततही चालणारी होती. काही त्याला जालना, धरणगाव, हुबळी, सुरत इ. ठिकाणच्या लुटीतही मिळाली असतील. सुरतेच्या लुटीत त्यांना सोने, रुपे, मोती, पोवळे, माणिक, हिरे, पाच, गोंत्रेदराज, वैदूर्य अशी नवरत्ने, नाणे, मोहरा, पुतळ्या, इभ्राम्या, सतराम्या, असर्फ्या, होन, नाणे नाना जातीचे इतक्या जिनसांच्या कोकटिया भरल्या. कापड, भांडे, तांब्यांचे वरवड हान (अन्य) जिन्नस यास हात लाविलाच नाही असे शहर दोन दिवस अहोरात्र लुटले.

अ. ब. देशपांडे रायगावकर शिवकालीन चलनासंबंधी म्हणतात, 'शिवकाली टक्का हे नाणे प्रचारात होते. त्याशिवाय सकाही होता. ४८ रुक्यांचा १ टक्का व १२ टक्यांचा होन. होनाचे मूल्य ३ रुपये धरल्यास टक्का हे चार आणे किंमतीचे नाणे असावे (होते). १९२ रुक्यांचा रुपया होई. म्हणजे रुका हा अलीकडील १ पैशाएवढा असे.' सारांश होन, रुका, टक्का, शिवराई, आडका, दमडी ही नाणी शिवकालात असावीत.

फ्रेंच प्रवासी टॅव्हरनियर इकडील नाण्यासंबंधी म्हणतो, भारतात रुपया, अधेली, पावली, आणा ही नाणी चालतात. लहान नाण्यात पैसा, अर्धा पैसा (अधेला), दोन पैसे (फद्या), चार पैसे ही नाणी आहेत. सुरतेस रुपयास ४९ पैसे मिळतात. एक वेळ ते ५० मिळतात व दुसऱ्या खेपेस ४६ मिळू लागले होते. आग्रा व गेहनाबाद येथे रुपयाला ५५–५६ पैसे येत. याचा अर्थ असा की जो जो तांब्याच्या खाणी जवळ जावे तो तो रुपयास मिळणाऱ्या खुर्द्याचा भाव उतरत जातो.

शिवकालात मापे ही निरनिराळ्या वस्तूची निरनिराळी, मोजण्याचे माप वेगळे,

पातळ पदार्थासाठी मापे वेगळी, धान्य वेगळ्या मापांनी मोजायचे, तर अंड्यांचे माप शेकड्यावर.

जमीन मोजणीच्या मापात काठी, नागर, दोरी, बाण, परमने, ठिकणे, टका, नवटाक, सका, खंडी, टाके, बिघा, चावर, नसु गजशरई इ.चा समावेश तर काही तत्कालीन कागदपत्रांत शेर, अर्धा शेर, असाही उल्लेख मिळतो. इ. स. १६४९–५० च्या पत्रात जमीन गज-शरायेणी यावर मेक असा उल्लेख तर इ. स. १६६४ पत्रावरून जमिनीच्या मापाची माहिती मिळू शकेल.

लबु तडना जवान । नयाच्या च्यार विती जाण
येका गजाचे प्रमाण । ते तीन मेका पाडाचे
यास परीस उणा । तसु येक गजशराई ॥

काठी हे शिवकालातील जमीन मोजण्याचे परिमाण. तिला ‘ शिवशाही ’काठी संबोधले जाई. ही काठी पाच हात व पाच मुठीची असे. सभासद म्हणतो ‘ पाच हात पाच मुठीची काठी, हात चवदा तसूचा असावा, हात व मुठी मिळून ऐशी तसूची लांबी काठीची, वीस काठ्या औरस चौरस त्याचा बिघा एक. बिघे एकशेवीस त्यांचा एक चावर. ’

नितने हे मेक जमीन मोजण्याचे माप. १६२४च्या पत्रात ‘ कसबे मजकुरी त्रिंबकजी नायेक आपण जे पैके लागतील ते वेचून तले करू पाहताती. तरी त्यासी तेरा नितने तीन बिघे म्हणजे १ चावर इनाम अजराम हातती करून दिले ’ असा उल्लेख आढळतो. तर एका ठिकाणी ‘ जमीन नवटाक येकूण बिघे तीस ’ असा उल्लेख तत्कालीन कागदपत्रात आहे.

५ बिघ्यांचा १ सका बनला जाई तर काही ठिकाणी १० बिघ्यांचा १२० स्क्वेअर बिघापासून टका बनत असे. $\frac{१}{२०}$ बिघा किंवा $\frac{१}{२०}$ स्क्वेअर काठीचा = १ पांड. १२० बिघाचा १ चावर होत असे. जमीन मोजणीसाठी नांगर, दोरी, बाण इ. मापांचाही उपयोग करतात.

गुंज, वाल, मासा, तोळा या मापानी सोने, चांदी मोजली जात असे. भार या मापाचा क्वचित उपयोग. अधोलीभार, पावलीभार म्हणजे अर्धातोळा, पावतोळा.

धान्य मोजण्यासाठी चिपटे, मापटे, शेर, अधोली, पायली, आठकी, मण, कुडव, खंडी इ. चा उपयोग करीत. तिळवे, कोळवे ह्या लहान मापाद्वारा, तीळ, जवस, कारले इ. ची. शेजाऱ्यापाजाऱ्यांत देवाणघेवाण केली जाई. चिपटे हे लहान माप असे तर मापटे त्याच्यापेक्षा दुप्पट असे. अधोली, पायली, शेर इ. चा उपयोग पेशवाईत ब्रिटिशाईतही होत होता.

अगुळ, तसू, बीत, हात आणि गज ह्या मापाद्वारा कापड मोजले जाई. लाकडे मण

आणि खंडीने मोजली जायची. आंबे शेकड्यांनी मोजले जात तर कडब्या पाचुंद्याने, पाचुंद्या म्हणजे पाच पेंढ्या मग त्या लहान वा मोठ्या असोत.

संदर्भ ग्रंथ सूची

१. सभासद बखर–कृष्णाजी अनंत सभासदकृत.
२. शिवभारत–कवी परमानंद.
३. शिवचरित्र साहित्य भाग २, ५, ४, ३, ९.
४. शिवकालीन पत्रसारसंग्रह भाग १, २, ३.
५. मराठ्यांच्या इतिहासाची साधने.—(संपा. राजवाडे, वि. का) भाग ८, १५, २०, २१.
६. पेशवे दप्तर (संपादक सरदेसाई) भाग ३१ वा.
७. महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास–संपा. आपटे, ओतुरकर.
८. Administrative System of the Marathas–S. N. Sen.
९. Shivaji and his times–Jadunath Sarkar.
१०. Rise of the Maratha Power– Ranade M. G.
११. Shivaji the Great–Vol. IV - Dr. Balkrishna.
१२. English Factories in India 1655–60 Vol. I–Foayal.
१३. From Akbar to Aurangzeb–Moreland W. H.
१४. भारत इतिहास संशोधन मंडळाचे–त्रैमासिक, अंक ३ ते ५१.
१५. भारत इतिहास संशोधन मंडळ–संमेलनवृत्त अंक ४, ५, ६.
१६. मंडळातील नाणी–ग. ह. खरे.
१७. शिवचरित्र निबंधावली–भा. इ. सं. मं. पुणे.
१८. New History of the Marathas–Sardesai G. S., Vol I.
१९. शिवकालीन महाराष्ट्र–वा. कृ. भावे.
२०. Article of Kale V. G. on Currency in Shivaji's kingdom.

' सर जदुनाथ सरकार : ए प्रोफाईल इन हिस्टोरिओग्राफी '* या ग्रंथाच्या निमित्ताने

प्रा. मनोहर कुलकर्णी

इतिहासाचा तसेच इतिहासकारांचा इतिहास हा दुय्यम प्रकारचा इतिहास मानला जातो. अशा प्रकारच्या अभ्यासांनी ' इतिहास समजावून घेण्या अगोदर इतिहासकारास समजावून घ्या ' ह्या एडवर्ड कारच्या सल्ल्याप्रमाणे वागण्यास मदतच होते. मराठ्यांच्या इतिहासाचे एक थोर इतिहासकार सर जदुनाथ सरकार यांच्या इतिहास लेखन-पद्धतीचा एक सुंदर अभ्यास ऑगस्ट, १९८५ मध्ये प्रसिद्ध झाला. चंदीगडच्या डॉ. सौ. किरण पवार ह्यांनी तो केलेला आहे. त्यांचा हा पी.एच. डी. चा प्रबंध आहे. पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथील इतिहास विभागातील प्राध्यापक आर. सी. जोहरी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. पवार ह्यांनी हा प्रबंध तयार केलेला आहे. पुस्तकाची रचना, मांडणी व प्रामुख्याने भाषाशैली अत्यंत सुंदर आहे. सर जदुनाथ हे वाङ्मयीन व सुंदर अशा ललित शैलीमध्ये इतिहास लिहिणारे म्हणून मान्यवर व सुप्रसिद्ध आहेत. त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा हा प्रबंधही त्यांच्या शैलीस साजेसा असाच झाला आहे.

प्रबंधाची विभागणी एकूण सात प्रकरणांत केलेली आहे. सर जदुनाथांचे बालपण, शिक्षण इ. वैयक्तिक बाबींचा उल्लेख करीत ते इतिहासाच्या अभ्यासाकडे का व कसे वळले हे ह्या आरंभीच्या प्रकरणात दिलेले आहे. दुसऱ्या प्रकरणात सर जदुनाथांच्या ' इतिहासकार ' बनण्यातील जडण-घडणीचा सुंदर आलेख मांडलेला आहे. जर्मन इतिहासकार रॅन्केचा त्यांच्यावर प्रभाव होता. इंग्रजी साहित्य, बौद्धिक ग्रंथ तसेच पाश्चात्त्य इतिहासकारांच्या सखोल वाचनाने सर जदुनाथांचा इतिहास विषयाकडे ओढा निर्माण झाला. त्यांनी इतिहासाचार्य राजवाडे यांच्या महान कार्याप्र माणे इ

हासाची मूळ साधने शोधून प्रकाशित करणे व त्यांचा वापर करून इतिहास लिहिणे या कार्याची केवळ बंगालमध्येच नव्हे तर उत्तरेत पायाभरणी केली. या त्यांच्या अफाट परिश्रमाचा मोठ्या सुंदर मार्मिक पण आत्मीयता, भावनेने भरलेला एक आलेख ह्या प्रकरणात वाचावयास मिळतो. लेखकाच्या शैलीने खरोखरच वाचक भारावून जातो. सर जदुनाथ परिपूर्ण इतिहासकार कसे घडले व त्यांनी मध्ययुगीन इतिहास-लेखनालाच नवे वळण कसे दिले हे ह्या प्रकरणात फारच उत्कृष्टपणे मांडलेले आहे.

तीन ते सहा ह्या प्रकरणांत सर जदुनाथांच्या इतिहास-लेखनाचा, त्यांच्या अन्वयार्थाचा, आढावा घेतलेला आहे. ते औरंगजेबाच्या इतिहासाकडे का वळले ? त्यांनी ह्या अत्यंत वादग्रस्त अशा बादशहाची आपल्या इतिहास-लेखनाच्या आरंभी का निवड केली ? ह्याचे फार छान पण मनाला पटण्याजोगे विश्लेषण दिलेले आहे. सर जदुनाथ ह्यांना सर्व मोघल बादशहांमध्ये औरंगजेबानेच का एवढे आकर्षित केले ह्याचे कारण यांच्या शिष्योत्तमापैकी डॉ. ए. एल. श्रीवास्तव ह्यांनी दिले ते असे...‘ औरंगजेबाच्या ठिकाणी असलेले एक विचित्र ‘ राजकीय परस्परविरोधी ’ मिश्रण यामुळे त्याची कारकीर्द केवळ भारतीय इतिहास अभ्यासकांनाच नव्हे तर राजकीय तत्त्ववेत्त्यांनासुद्धा आकर्षित करणारी आहे. ’ प्रस्थापित व मान्यवर अशा मध्ययुगीन सर्वच अभ्यासकांची व इतिहासकारांची औरंगजेबाविषयीची मते सर जदुनाथ ह्यांनी आपल्या इतिहासाने खोडून काढली. ह्या अभ्यासामधूनच ते मराठ्यांच्या इतिहासाकडे वळले हे सर्वश्रुतच आहे. औरंगजेबाचा प्रमुख प्रतिस्पर्धी व आपल्या ह्या लाडक्या बादशहाला अस्वस्थ करणाऱ्या छत्रपती शिवाजीच्या हालचालीकडे त्यांचे लक्ष वेधले गेले. त्यांचे छत्रपती शिवाजी तसेच मराठ्यांच्या इतिहासाचे अन्वयार्थ व त्याचे सटीप परीक्षण येथे आले आहे. सर जदुनाथांनी केवळ राजकीय इतिहास लेखन न करता, मध्ययुगीन सर्वच क्षेत्राचे विशेष करून प्रशासन, राज्यकारभार इ.चा सखोल अभ्यासही केला.

प्रस्तुत प्रबंधाचे शेवटचे प्रकरण ‘ सर जदुनाथांचे ऋण, प्रभाव व त्यांच्या कार्याचे मूल्यमापन ’ ह्याबद्दल आहे. त्यांचे कार्य युग-प्रवर्तक कसे ठरले हे सांगताना डॉ. सौ. पवार “सर जदुनाथांच्या शिष्य, त्यांचे शिष्य ह्यांची एक भव्य व उज्ज्वल अशी परंपरा निर्माण झाली हे सविस्तर दिले आहे.” डॉ. सुरेंद्रनाथ सेनांच्या सारखे ‘ मराठ्यांच्या राज्यकारभार व लष्कर व्यवस्थे ’चे एक मान्यवर व अधिकारवाणीचे इतिहासकार ह्या परंपरेतूनच निर्माण झाले. बंगाल व महाराष्ट्र ह्यांचे एक असे अतूट, ओघवते भावनिक नाते निर्माण झाले असा अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे. याच विवेचनात स्वाभाविकपणेच रियासतकार गो. स. सरदेसाईंचे नाव ओघाओघानेच आले. सरकार–सरदेसाई ह्यांची पन्नास वर्षांची मैत्री कशी उपकारक व फलदायी झाली ह्याचा वृत्तान्त महाराष्ट्रीयांना परिचितच आहे. डॉ. सौ. पवार ह्या आपल्या विवेचनाच्या ओघात पान १८२ वरच्या शेवटच्या ओळीत म्हणतात, ‘ गो. स. सरदेसाई हे ‘ संकलनकार ’ न

राहता एक 'अव्वल दर्जाचे संशोधक' व 'महाराष्ट्राचे एक सर्वश्रेष्ठ आद्य इतिहासकार' झाले ह्याचे श्रेय ह्या दोघांच्या पंचावन्न वर्षांच्या अतूट मैत्रीला द्यावे लागते. त्यांच्या ह्या विलोभनीय व उच्च कोटींच्या मैत्रीमधून 'सरकार-सरदेसाई' हा केवळ पत्रव्यवहारच निर्माण झाला नाही तर त्यांच्या संयुक्त परिश्रमाने मराठ्यांचा इतिहास रचला गेला."

सरकार–सरदेसाई मैत्रीचा वर केलेला उल्लेख हाच धागा डॉ. सौ. पवारांच्या ह्या अत्यंत उत्कृष्ट ग्रंथाचे निमित्ताने घेऊन मी एक स्वतंत्र मुद्दा ह्या ठिकाणी मांडू इच्छितो. किंबहुना तो मांडण्यासाठी सौ. पवारांचे हे पुस्तक मी निमित्त केलेले आहे. इ. स. १९६१ मध्ये कै. श्री. रा. टिकेकर ह्यांनी 'सरकार–सरदेसाई एक तौलनिक चरित्रात्मक अभ्यास' हा ग्रंथ प्रकाशित केला. श्री. टिकेकर ह्या मैत्रीचे एक साक्षीदार व सहभागी ह्या नात्याने सुप्रसिद्ध आहेत. त्यांनीच इंग्रजीमध्येही ह्या दोघांच्या इतिहासलेखनपद्धतीवर 'ऑन हिस्टोरिओग्राफी' हा ग्रंथ लिहिला होता. श्री.टिकेकरांचा तौलनिक चरित्रात्मक अभ्यास तसा एकतर्फी वाटतो. त्यांनी सर जदुनाथांच्या कार्याचे वर्णन करताना त्यांच्या पदरात जरा घवघवीत माप टाकले आहे असे वाटते. त्यांच्या बाजूने हा लेखक जरा जास्तच झुकलेला दिसतो. त्याचे समर्थन करता येईल. श्री. टिकेकरांना सर जदुनाथांच्या भाषाशैलीची, बौद्धिक तेजाची भुरळ पडली असावी. श्री. टिकेकरांना त्यांच्या वैयक्तिक जीवनात ह्या दोघांच्या वागणुकीच्या संदर्भातही तसे काही अनुभव आल्यामुळेही हा असमतोल निर्माण झाला असण्याची शक्यता आहे. मुळातच असा तौलनिक अभ्यास करणे कितपत सयुक्तिक ठरेल ह्याविषयी शंका आहे. ह्या अभ्यासपद्धतीच्या काही स्पष्ट व गंभीर स्वरूपाच्या मर्यादा आहेत. त्यामुळे जर कोणावर निष्कारण अन्याय होणार असेल तर ह्या पद्धतीचा वापर मर्यादित अर्थाने व संदर्भाने करणेच योग्य ठरेल असे वाटते.

स्वतंत्रपणे सर जदुनाथांचे जसे एक सुंदर 'प्रोफाईल' डॉ. सौ. किरण पवार ह्यांनी आज अभ्यासकापुढे ठेवले आहे तसेच रियासतकारांचेही तयार करणे शक्य आहे का ? हे पाहणे फार महत्त्वाचे आहे. इ. स. १८९८ साली आपली 'मुसलमानी रियासत' प्रसिद्ध करून रियासतकार गो. स. सरदेसाई ह्यांनी पुढील साठ वर्षे अखंड-पणे परिश्रमपूर्वक 'मराठी रियासत' तयार केली. तिच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. प्रत्येक आवृत्ती ही परिपूर्ण व आद्ययावत करण्याकडे त्यांचा कटाक्ष होता. त्यांच्या रियासतीच केवळ मराठ्यांचा समग्र इतिहास सांगणाऱ्या आजही एकमेव आहेत. अनेकांनी अनेक पद्धतीने मराठ्यांचा समग्र इतिहास लिहिला व तो प्रकाशितही केला. पण त्यांनी रियासतीची लोकप्रियता कमी झाली नाही. महाराष्ट्रीयांना मराठ्यांच्या इतिहासाची गोडी व माहिती रियासतीनेच मिळाली. इ. स. १९५९ मध्ये रियासत-कारांचे निधन झाले. त्यानंतर ह्या रियासती प्रकाशित होणे बंद झाले. मध्यंतरी पहिल्या चार भागांच्या नव्या आवृत्त्या प्रकाशक ढवळे ह्यांनी काढल्या; पण त्याही आज

उपलब्ध नाहीत. आपल्या रियासतीवर अनेकजण विसंबून असतात ही जाणीव सरदेसायांना होती म्हणून ते नेहमी जागरूक असत. सर्व उपलब्ध माहिती, नवे संशोधन आपल्या लेखनात वापरत.

रियासतींचे केवळ पुनर्लेखन केल्यानेच रियासतकारांच्या कार्याची नव्या पिढीला ओळख होणार आहे. गेल्या तीस-चाळीस वर्षांत जे नवे संशोधन, प्रकाशन झाले त्याचा वापर करून हे पुनर्लेखन व्हावयास पाहिजे. हे कार्य त्यांनी एकट्यांनी अखंडपणे केले. पण त्याचेच पुनर्लेखन मात्र अनेकांनी एकत्रित येऊन करावे लागणार आहे. त्याचबरोबर रियासतकारांच्या इतिहासकार म्हणून कार्याचे योग्य ते मूल्यमापनही होणे आवश्यक आहे. त्यांना औपचारिक मान-सन्मान, पदव्या मिळाल्या. पण इतिहास-संशोधन, संशोधक, इतिहास लेखन ह्या क्षेत्रात मात्र त्यांची 'उपेक्षाच' झाली. ह्याचा पुनर्विचार करण्याची वेळ आता आली आहे असे वाटते.

मावळते मल्हारराव होळकर : उदयोन्मुख महादजी

डॉ. भा. रा. अंधारे

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर करण्याचे श्रेय तरुण पेशवा थोरल्या बाजीरावांनी केले. या कार्याकरिता थोरल्या बाजीरावांनी अनेक सरदारांना पैलू पाडले, आणि ते सरदार मराठा साम्राज्याचे आधारस्तंभ झाले. त्या प्रमुख सरदारांमध्ये शिंदे, होळकर, गायकवाड, पवार या-सारख्या सरदारांना बाजीरावांनी हाताशी धरून मराठ्यांचे प्रभावक्षेत्र उत्तर भारतात निर्माण केले. या सरदारांमध्ये महादजी शिंदे आणि मल्हारराव होळकर यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. प्रा. राम इंगळे यांनी ह्या होळकर-शिंदे यांच्या कामगिरीचे चिकित्सक दिग्दर्शन प्रस्तुत पुस्तकात अत्यंत मार्मिकपणे पण थोडक्यात केल्यामुळे हे पुस्तक मौलिक स्वरूपाचे असून मराठी माध्यम घेणाऱ्या इतिहासाच्या विद्यार्थ्यांकरिता आणि सर्वसाधारण वाचकांकरिताही अत्यंत मोलाचे आहे, हे निर्विवाद होय. शिंदे-होळकर संबंधाचे १७२८–१७६१ पूर्वार्ध व १७६१–१७९४ माध्यान्ह या दोन कालखंडांचाच इतिहास-लेखकांनी तत्कालीन अस्सल मूळ अप्रकाशित आणि प्रकाशित (सर्व भाषांतील) व दुय्यम ऐतिहासिक साधनांचे सखोल अध्ययन केल्यानंतरच साधार निष्कर्ष काढून लिहिला आहे. प्रचलित असलेली कलुषित अनुमाने दूर करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. त्यांच्या कठोर परिश्रमांचा नजराणा "मावळते मल्हारराव व उदयोन्मुख महादजी" या रूपाने मराठ्यांच्या इतिहासाला भेट दिला.

पहिल्या प्रकरणात मल्हारराव व राणोजी शिंदे यांच्या सहकार्यामुळेच थोरल्या बाजीरावांनी जुन्या पिढीतील प्रतिनिधी व सुमंत यांसारख्या मातब्बर लोकांचा विरोध पत्करून उत्तरेत अटकेपर्यंत मराठ्यांच्या घोड्यांना पाणी पाजले. पालखेडच्या युद्धात बाजीरावांनी (१७२८) निजामास जेरीस आणण्याचे कार्य राणोजी व मल्हारराव, पवार बंधू बाजी व भीमराव यांनी केले. बाजीरावांच्या २० वर्षांच्या कारकीर्दीत शिंदे

आणि होळकरांनी गनिमी काव्याचे प्राथमिक धडे गिरवले. माळवा विजयाचे श्रेय चिमाजी अप्पा बरोबर राणोजी शिंदे व मल्हारराव होळकर यांनाही आहे हे लेखकांनी साधार सिद्ध केले. राणोजी शिंदे व मल्हारराव होळकर बाजीरावांच्या पाठीशी उभे राहिले त्यामुळे मराठी राज्याचा विस्तार होऊ शकला.

गुजरात मोहिमेत दाभाड्यांचा मोड करण्यात महत्त्वाची कामगिरी शिंदे-होळकरांनी केल्यामुळेच त्यांना पेशव्यांनी सोन्याची कडे व वस्त्रे देऊन सन्मान केला. लेखकाने बुंदी प्रकरणावर विशेष प्रकाश टाकला आहे. सवाई जयसिंहाने बुंदीचा राजा बुधसिंगास पदच्युत करून जावाई दलीलसिंहास गादीवर बसविले. परंतु त्याचा भाऊ प्रतापसिंह हाडा यांनी विरोध करून शिंदे-होळकरांच्या मदतीने बुधसिंगाची पुनः स्थापना केली. राजस्थानाच्या राजकारणाच्या सुरुवातीला शिंदे-होळकर एकोप्याने वागून मराठा साम्राज्याच्या हिताकडे लक्ष दिले.

भोपाळच्या नबाबाचा पराभव करण्यात शिंदे-होळकरांचा सिंहाचा वाटा होता. बाजीराव सैन्यासह दिल्लीस आले असताना शिंदे-होळकरांच्या मदतीने बादशाही सैन्याचा पराभव केला. थोरले बाजीराव प्रत्यक्ष दिल्लीजवळ असताना शहर नष्ट केले नाही व बादशाहाचा अपमानही केला नाही. तैमूर व चेंगेजचा कित्ता बाजीरावाने गिरवला नाही, कारण मराठे त्यांच्यापेक्षा सुसंस्कृत होते आणि मराठी साम्राज्यवादाचा आदर्श चौथाई होता हा लेखकाने काढलेला निष्कर्ष अतिशय महत्त्वाचा आहे. चिमाजी अप्पाच्या प्रसिद्ध वसई मोहिमेत शिंदे-होळकर यांनी पराक्रम गाजविला ही माहिती मात्र नव्यानेच येत आहे. बाजीरावाच्या मृत्यूपर्यंत शिंदे-होळकर या दोघांनी हृदयापासून मराठा साम्राज्याची सेवा केली हे साधार पुराव्यासह लेखकांनी काढलेला निष्कर्ष योग्य आहे. परंतु बुंदेलखंडातील राणोजी मल्हारबाच्या कामगिरीचा ओझरताच उल्लेख केला आहे.

जयपूरच्या वारसा युद्धात शिंदे-होळकरांनी स्वीकारलेल्या भूमिकेचे अचूक विश्लेषण लेखकाने केले आहे. राजपुतांची स्वामिनिष्ठा प्रथमपासूनच मोगलांकडे असल्यामुळे मराठ्यांना राजपुतांची मदत कधीच मिळू शकली नाही. जयाप्पाच्या वधात मल्हारबा जबाबदार नव्हते हा पुराव्यासह प्रा. इंगळे यांनी काढलेला निष्कर्ष ठोस पुराव्यावर आधालेला आहे. १७४५ पर्यंत शिंदे-होळकर एकोप्याने वागत होते. परंतु जयाप्पाच्या निधनानंतर मल्हारराव दत्ताजीचे सांतवन करण्यास आले असता दत्ताजीने भेटण्याचे नाकारले आणि तेव्हापासूनच शिंदे-होळकरांत मतभेदाला सुरुवात झाली. परंतु मल्हाररावांनी स्वतःची वय आणि प्रतिष्ठा बाजूला ठेवून जनकोजीची भेट घेतली आणि त्याचे सांतवन करून आपसातील गैरसमज दूर केले, असे लेखकाने जनकोजीच्या पत्राचा हवाला देऊन सिद्ध केले. परंतु मल्हाररावाने नजीबखानासी सलोख्याचे धोरण का स्वीकारले या प्रश्नाचे उत्तर मात्र मनाला पटत नाही. उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व नष्ट करण्याकरिता नजीबखानाने अहमदशहा अब्दालीला बोलाविले. नजीबखान

मराठ्यांशी इमानदारीने वागला नाही याला काही प्रमाणात मल्हारराव जबाबदार होते.

इ. स. १७६१ मध्ये पानिपतच्या युद्धात सदाशिवराव भाऊंचा दुराग्रही स्वभाव आणि सूरजमल जाटचे म्हणणे न ऐकल्यामुळे मराठ्यांचा दारुण पराभव झाला. परंतु लेखकाने म्हटले आहे गनिमी काव्याचा त्याग करून समोरासमोर युद्ध केल्यामुळे मराठ्यांचा पराभव झाला हे मात्र पटत नाही. परंतु त्याचबरोबर पानिपतच्या रण-संग्रामात मल्हारराव निष्क्रिय राहिले हा इतर इतिहासकारांनी केलेला आरोप मात्र लेखकाने दूर केला. त्याकरिता त्यांनी अस्खलित पुरावे देऊन सिद्ध केले की, मल्हारबा होळकर युद्धात लढले आणि त्यांनी कोणत्याही प्रकारची कुचराई केलेली नाही. उत्तर भारतातील राजकारणाचा दीर्घ अनुभव असलेला ज्येष्ठ वृद्ध व प्रतिष्ठाप्राप्त मल्हारबाचे म्हणणे भाऊसाहेबांनी ऐकले नाही हे ठासून लेखकाने प्रतिपादन केले. पानिपतानंतर मल्हारबांवर नानासाहेब पेशव्यांनी उत्तरेकडील जबाबदारी सोपविली यावरून मल्हारबांच्या श्रेष्ठतेची कल्पना येते. पानिपतच्या पराभवाला मल्हारराव जबाबदार नव्हते. लेखकाने काढलेल्या निष्कर्षाने मल्हारबांची प्रतिमा उजळून निघण्याचे श्रेय लेखकाला आहे.

मंगरोळ व भाटवडच्या युद्धात जातीने मल्हारबा लढले आणि जयपुराच्या माधव-सिंहाचाही पराभव केला. या दोन्ही युद्धांत शिंदे-होळकर सामोपचाराने वागले आणि पानिपतच्या पराभवाने मराठीशाही संपुष्टात आली ही भावना दोघांनी नाहीशी करून मराठ्यांत आत्मविश्वास निर्माण केला. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत राक्षस-भुवनाच्या युद्धात पेशव्यांनी मल्हारबांना खास पाचरण करून गनिमी कावा आणि निजामाकडे सामील झालेले मराठे सरदार फोडण्याची किमया दाखवून निजामाला वठणीवर आणले ही माहिती लेखकाने पुराव्यानिशी आवेशपूर्ण भाषेत मांडली आहे.

इ. स. १७६५ मध्ये कूराच्या मैदानात मल्हाररावांना इंग्रजांकडून पराभव पत्करावा लागला. हा पराभव मल्हाररावचे वय व जुनी युद्धपद्धती आणि आधुनिक शस्त्रांचा अभाव यामुळे पराभव झाला हे म्हणणे लेखकाच्या सखोल अभ्यासाचे निदर्शक आहे. आतापर्यंत महादजी व मल्हारराव एकदिलाने एकविचाराने कार्य करत होते. परंतु या सुमारास पेशव्यांच्या घरातच काका रघुनाथराव व माधवराव याच्यातील मतभेद दूर करण्याचे कार्य मल्हाररावांनी केले हे विसरता येत नाही.

मल्हाररावाचा मृत्यू आलमपूर येथे (झाशीजवळ) २० मे १७६६ रोजी झाला आणि त्यांच्या दोन पत्नी द्वारकाबाई आणि बजाबाई सती गेल्या. या वेळी रघुनाथराव पेशव्यांनी मल्हाररावांच्या अंत्यसंस्कार व इतर धार्मिक विधीवर २ लाख रुपये खर्च करून आलमपूरचे नाव मल्हारनगर ठेवले इतकेच नव्हे तर पेशवे सरकारने १५ गावांचे उत्पन्न मल्हारबाच्या समाधीच्या आणि छत्रीच्या प्रबंधाकरिता लावले. या ठिकाणी मल्हारबाचे स्मारक म्हणून सुंदर शिल्पकलेनेयुक्त असे देऊळ असून त्यात मल्हारबांची आणि त्यांच्या दोन पत्नींच्या प्रतिमा आहेत. देवळाच्या आत सुंदर

कोरीव काम आहे. तेव्हा लेखक स्वतः आलमपूर येथे गेले असते आणि त्या ठिकाणी छत्रीची आणि इतर माहिती प्राप्त केली असती तर मल्हाररावाच्या इतर पैलूंची ओळख वाचकांना झाली असती.

लेखकांनी मल्हारबा आणि महादजींची तुलना अगदी वेचक व योग्य शब्दांत केली असून मल्हाररावांचा वारसदार तुकोजी होळकर नसून महादजी शिंदे हा होय हा लेखकाने काढलेला निष्कर्ष अतिशय समर्पक आहे. महादजींच्या कर्तृत्वाचा ठसा १७६९ पासून १७९४ पर्यंत भारताच्या इतिहासावर स्पष्टपणे पडलेला दिसून येतो.

मल्हाररावांच्या मृत्यूनंतर होळकरांच्या दौलतीवर रघुनाथरावांचा डोळा होता त्या वेळी पेशवा माधवरावाने लिहिलेले पत्र "उद्‌बोधक" आहे. "तुमचे दौलतीविषयी पाप बुद्धी ठेवी त्याचं पारिपत्य बेशक करावे." रघुनाथरावाचा डाव महादजीच्या विरोधामुळे आणि अहिल्याबाईच्या पत्रामुळे कसा फसला हे सर्वश्रुत आहे. मल्हारबाच्या मृत्यूनंतर उत्तरेकडील राजकारणात महादजीने मराठ्यांचे प्रभुत्व प्रस्थापित केले. परंतु राजपूत राजकारणाबाबत महादजी आणि तुकोजी होळकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. तरीपण दोघांनीही समंजसपणा दाखविला. उदयपूरच्या राणा रतनचा महाद्‌जीने पक्ष घेतला आणि तुकोजीने राणा आरसीचा पक्ष घेतला. या वेळी तुकोजी निघून गेले आणि महादजीने राणा आरसीकडून खंडणीचा करार केला ही गोष्ट नव्यानेच येत आहे. या वेळी नजीबखानाने तुकोजी होळकरामार्फत मराठ्यांशी मैत्री केली, त्याबाबत महादजीने तीव्र नापसंती व्यक्त केली. नजीबखान ३१-१०-७० रोजी मरण पावला. पानिपतच्या रणसंग्रामामुळे मराठे शहाणे झाले आणि त्यांनी जावेतखानाचा डाव यशस्वी होऊ दिला नाही. या वेळी जावेतखानाला कैदेत ठेवावे असे महादजीचे मत होते, परंतु तुकोजीने विरोध केला. लेखकाने स्पष्टपणे म्हटले आहे की, तुकोजीच्या अंगी मल्हाररावच्या कर्तृत्वाचा अभाव होता. सर्वांत महत्त्वाची गोष्ट माधवरावांनी या मोहिमेकडे सूक्ष्म लक्ष दिले होते आणि मदतीची तयारीही सुरू केलेली होती. महादजीने सम्राट शहाआलमला इंग्रजांच्या जाळ्यातून सोडवून ६ जानेवारी १७७२ रोजी दिल्लीच्या गादीवर बसविले आणि पानिपतचा कलंक धुऊन काढला, परंतु दुर्दैवाने १८ नोव्हेंबर १७७२ रोजी माधवरावाचे अकाली निधन झाले त्यामुळे उत्तरेकडील मराठा सरदारांना स्वदेशात यावे लागले आणि पेशवे कुटुंबात माधवरावांच्या निधनानंतर दुही निर्माण झाली. या दुहीचा लाभ शिंदे–होळकर सरदारांनी घेतला म्हणूनच वासुदेवशास्त्री खरे लिहितात, "जेथे धन्याच्या घरात दुफळी तेथे नोकरांची चंगाळी" हे धोरण शिंदे-होळकर-गायकवाडांनी नंतरच्या काळात स्वीकारले. नारायणरावाच्या खुनानंतर रघुनाथरावाला पेशवेपद लाभू नये म्हणून सखाराम बापू व नाना फडणवीस यांनी बारभाईचे कारस्थान उभे केले. यात पुन्हा होळकर आणि शिंदे यांच्यात मतभेद झाले.

नाना व महादजी मराठा साम्राज्यरूपी एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या ही बाब

दोघेही शेवटपर्यंत विसरले नाहीत. पहिल्या आंग्ल मराठा युद्धात इंग्रजांच्या विरोधात चतुरसंघाच्या स्थापनेचा जनक निजाम होता ही गोष्ट प्रथमच वाचकांसमोर आणण्याचे श्रेय लेखकाला आहे. गुजरातमध्ये महादजी आणि तुकोजीने इंग्रजांशी मुकाबला केला. वडगावच्या तहानंतर नाना आणि महादजीमध्ये आशिरगडचा किल्ला महादजीला देण्याबाबत मतभेदाला सुरुवात झाली. नंतर नारायणरावाचा मारेकरी सुमेरसिंग आणि तुळ्या पवार यांना महादजीने नानाच्या हवाली केले नाही, रघुनाथराव महादजीच्या नजरकैदेत असताना निसटला, या कारणामुळे नाना आणि महादजीमध्ये मतभेदाची सुक्त खाई निर्माण झाली याची दखल लेखकाने घेतलेली दिसत नाही, तरीपण नाना – महादजी एकमेकाचे कर्तृत्व जाणून होते. त्यामुळे नानाला सैनिकी डावपेचाबाबत महादजीचे म्हणणे ऐकणे भाग होते. याचे सविस्तर विवेचन लेखकाने करून फार मोलाची भर प्रस्तुत पुस्तकात घातलेली आहे हे आपणास विसरता येणार नाही. १७८२ चा इंग्रजाबरोबर झालेला सालबाईचा तह महादजीच्या मध्यस्थीने झाल्यामुळे महादजीचे प्रस्थ वाढळे ही गोष्ट नानाला खटकली, कारण हा तह नाना व टिपू सुलतान यांच्या मध्यस्थीने व्हायला पाहिजे होता. परंतु महादजीने पेशव्यांच्या संरक्षणाचा जो बाणा धरला तो मरेपर्यंत सोडला नाही. महादजी शिंदे एकमेव अतुल दर्जाचे सेनापती व मुत्सद्दीपण होते हे प्रथम आंग्ल-मराठा युद्धाने सिद्ध झाले. १७७५ ते ८३ पर्यंत पेशव्यांच्या घरातील दुहीमुळे इंग्रजांना मराठीशाहीत हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली. त्यामुळे लेखकाने केलेले विधान अनेक शूर व मुत्सद्दी मंडळी नानामुळे सेवेला मुकली हे मात्र मनाला खटकते.

महादजीच्या मदतीकरता नानांनी अलीबहादूर व तुकोजी होळकर यांना उत्तरेस पाठविले. हे दोघेही उत्तरेत गेल्यावर गोसावी प्रकरण उद्‌भवले. गोसावी बंधू अलीबहादराच्या आश्रयाखाली असताना या दोघांना महादजीकडे सोपविण्यास अलीबहादरने नकार दिला. याकरिता नाना मुळीच जबाबदार नव्हता याची सांगोपांग चर्चा लेखकाने केली नाही. गुलाम कादरचे पारिपत्य केल्यानंतर महादजींचे म्हणणे न ऐकता गोसावी बंधूच्या मदतीने बुंदेलखंडात आक्रमण करून बांद्याचे राज्य स्थापन केले. वास्तविक पाहता नानांचे स्पष्ट सांगणे अलीबहादरला होते की गोसाव्यांना पाटिलबावांच्या हवाली करावे. अलीबहादर व तुकोजी या दोघांनी महादजीला कसे तोंडघशी पाडले याचे मार्मिक विवेचन लेखकाने केले आहे. एकट्या महादजीने राजपुतांचा पराभव करून चितोड काबीज केला ही गोष्ट प्रथमच इतिहास वाचकांसमोर आणण्याचे श्रेय लेखकाला आहे. परंतु त्याचबरोबर महादजींच्या महत्त्वाकांक्षेवर अंकुश राहावा म्हणून अलीबहादूरला नानाचा पाठिंबा होता ही गोष्ट मात्र खरी आहे.

महादजी मात्र नाना अलीबहादर तुकोजीपेक्षा सर्वच बाबतीत श्रेष्ठ आहे हे लेखकाने साधार पुराव्यासहित सिद्ध केले. सम्राट शहाआलमची इच्छा महादजीने नेहमीकरिता

मथुरेत राहावे ही होती परंतु महादजीला पुण्याला जाण्याची तीव्र इच्छा होती. परंतु महादजीने उत्तरेतच असावे अशी इच्छा नानाची होती, कारण महादजीच्या अनुपस्थितीत उत्तरेतील मराठा साम्राज्य नष्ट होईल याची जाणीव नानाला होती, परंतु महादजी पुण्याला आल्यानंतर आपले वर्चस्व [नानाचं] कमी होईल ही भीती नानाला एकसारखी वाटत होती, त्यामुळे येऊ नका असे नाना लिहीत असतानाही १२ जून १७९२ रोजी महादजी पुण्याला आले. त्यांचा मुख्य उद्देश सर्व सत्ता पेशव्यांच्या हाती असावी हा होता, परंतु नानाला वाटत होते की महादजी सर्व सत्ता आपल्या हातात घेऊन आपणाला निर्माल्यवत करेल. ही भीती नानाला एकसारखी वाटत होती, परंतु नानाची ही भीती अनाठायी होती हे महादजीने आपल्या २ वर्षांच्या पुणे येथील वास्तव्यात सिद्ध केले. याचे विश्लेषण लेखकाने उत्कृष्टपणे केले. महादजींच्या मुत्सद्देगिरीचे आकलन नानाला झाले नाही.

मराठेशाहीचे आधारस्तंभ शिंदे–होळकर–गायकवाड- भोसले हे होते, परंतु १७७५ नंतर प्रथम दोघांनीच अमोल सेवा केली. परंतु शिंदे–होळकरांत लाखेरीचे युद्ध झाल्यामुळे अपरिमित नुकसान झाले. लाखेरीच्या युद्धाची पार्श्वभूमी आणि कारणे लेखकाने साधार पुराव्यासह विशद केली. तसेच नंतर शिंदे–होळकरांत निर्माण झालेली दुही याचे विश्लेषण समर्थपणे मांडले. शेवटच्या प्रकरणात शिंदे–होळकरांसंबंधाचे समालोचन लेखकाच्या ग्रंथाचा सर्वोच्च बिंदू म्हटले तरी अतिशयोक्तिपूर्ण होणार नाही. ज्या वेळी शिंदे–होळकरांत मतभेद होते, त्या वेळी मतभेद पेशव्यांच्या घरात नव्हते आणि ज्या वेळी पेशव्यांच्या घरात मतभेद होते तेव्हा शिंदे–होळकरांत नव्हते. म्हणून मराठेशाही संकटात सुरक्षित राहिली. परंतु महादजींच्या मृत्यूनंतर (१७९४) मराठ साम्राज्यात निर्माण झालेली पोकळी भरून न निघण्यासारखी होती. महादजीच्या अस्ताबरोबर मराठा साम्राज्यरूपी सूर्याचा अस्त झाला. थोरले बाजीराव थोरले माधवरावसारखे मालक शिंदे–होळकरांना १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात न मिळाल्यामुळे मराठेशाही संपुष्टात आली.

प्रस्तुत ग्रंथात काही प्रमाणात मुद्रणदोष आहेत. परंतु स्थान आणि व्यक्तिसूचीचा अभाव हा दोष मात्र प्रकर्षाने जाणवतो, तरी पण लेखकांनी मावळते मल्हारराव होळकर आणि उदयोन्मुख महादजी या ग्रंथात तर्कशुद्ध साधारपुराव्यासहित आणि अत्यंत ओघवत्या भाषेत मांडलेल्या विचारामुळे हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा आणि मौलिक स्वरूपाचा असून मराठ्यांच्या इतिहासात मोलाची भर टाकील हे निर्विवाद होय.

[मावळते मल्हारराव होळकर : उदयोन्मुख महादजी
लेखक : डॉ. राम इंगळे
बिल्वभारती प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर
पृष्ठसंख्या १२० : किंमत ५० रु.]

टिपण

होळकरांची थैली

डॉ. वि. ना. हंडियेकर, भंडारा

इ. स. १८९२ मध्ये इतिहासाचार्य कै. राजवाडे ह्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ३ पान १८१ वर 'होळकरांची थैली' या नावाने एक अपूर्ण बखर प्रसिद्ध केली. पहिली १ ते १९ पाने गहाळ असल्याने त्यांना पान क्रमांक २० पासून पुढे प्रसिद्ध करणे भाग पडले. तशी खंत त्यांनी व्यक्तही केली. हे कागद मूलतः देवासचे असून तेथे विहिरीत सापडल्याचे म्हटले आहे. त्यांना ओझरडे येथे प्राप्त झाले. अगोदरचे १९ कागद जेव्हा केव्हा सापडतील ते प्रसिद्ध करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. त्यांना जाऊन ६० वर्षे होऊन गेली. परंतु गहाळ कागदाचा शोध लागला नाही असे समजते. १९६१ मध्ये श्री. सेतुमाधवराव पगडी व प्रा. न. र. फाटक द्वारा संपादित 'पानिपतचा रणसंग्राम' मध्ये फारशी प्रत वरून तर श्री. श. गो. चट्टे ह्यांनी शारदाश्रम यवतमाळ येथील प्रत वरून 'भारतीय इतिहास व संस्कृती' मुंबई त्रैमासिकात काही भाग प्रकाशित केला. तरीही नेमकी गहाळ असलेली १ ते १९ पाने हीच होत असे सांगू शकले नाहीत.

विक्रम विद्यापीठ उज्जैनच्या अंतर्गत असलेल्या 'सिंधिया ओरियन्टल इन्स्टिटयूट' उज्जैन येथे क्रमांक नं. ६०४२ मध्ये नेमकी अपूर्ण १ ते १९ कागद मोडी लिपीत उपलब्ध आहेत. अधिक चौकशी करता ते कागद मूळचे देवासचे असून ते ग्वाल्हेर येथे नेण्यात आले. १९४१ मध्ये शिंदे संस्थानच्या आधिनस्थ असलेल्या उज्जैन येथील 'सिंधिया ओरियन्टल इन्स्टिटयूट'मध्ये दाखल करण्यात आले. उपरोक्त कागद १ ते १९ पान असून मोडीत आहेत. या कागदांचा आकार २३ इंच × १५ इंच असून अक्षरे १·५ सेंमीची आहेत. मात्र त्यावर 'पानिपत्याची बखर' असे नोंद करण्यात आले आहे. बखरकार नारो सखाराम असून त्याने मोरो हरीच्या नावाने पत्ररूपी लिहिली आहे. पेशवा बाळाजी बाजीरावच्या आज्ञेनुसार दिल्लीहून लिहिले आहे. यासंबंधी

पुढील मुद्दे लक्षात घेण्यासारखे आहेत : (१) पानिपत युद्धासंबंधी हकीकत (२) हे कागद देवासलाच प्राप्त झाले आहेत. (३) नेमके १ ते १९ कागद आहेत. (४) मल्हारराव होळकरांचा उल्लेख सापडतो. (५) तत्संबंधी माहिती दिल्लीहून देण्यात आली आहे तर प्रश्न निर्माण होतो कै. राजवाडे ह्यांनी प्रसिद्ध केलेली 'होळकरांची थैली 'चे अपूर्ण कागद हे तर नव्हेत ? असल्यास त्यांनी व्यक्त केलेली इच्छा याद्वारे पूर्ण होईल. खुलासा व्हावा म्हणून मी पान क्रमांक दिले आहेत.

'कामायनी' में मनस्तत्त्वनिरूपण

डॉ. नीलकंठ साठे

वर्तमान युग में काव्य के अंतर्गत मनोविज्ञान की चर्चा करना या उसमें मनोविज्ञान के तत्त्वों का अन्वेषण करना कोई नयी बात भले न हों, फिर भी यह सच है कि इसके अभाव में आज का काव्य अपूर्ण-सा लगता है। मनोविज्ञान के अनुसार मानव मन ही मनुष्य की समस्त क्रिया और व्यापारों का एक मात्र केन्द्र है। भारतीय वाङ्मय में दर्शन के अंतर्गत मन का पर्याप्त विचार एवं विवेचन प्राप्त होता है। इसे आत्मा की सहायिका अत्यंत चंचल, दृढ एवं बलशाली इन्द्रिय माना है। भगवत् गीता में इस बात का उल्लेख है। मन ही मनुष्यके बंधन एवं मोक्ष का कारण माना गया है। अर्थात् मानव-मन ही उसके जीवन का संचालक है, यह भावना अधिक युक्तिसंगत होगा।

भारतीय दृष्टिकोण से मनको नियंत्रण में रखकर ही मानव अपने अभीष्ट लक्ष्य को प्राप्त कर सकता है। और जो अपने मन को नियंत्रण में नहीं रख पाता, उसका सारा जीवन जल में कंकड के पडने के बाद जैसे जल विक्षुब्ध हो उठता है, वैसा ही क्षुब्ध हो उठता है। शायद इसी कारण महात्माओं ने मन को वश में रखने के लिए कहा है। श्रीसमर्थ रामदासस्वामी ने 'मनाचे श्लोक' में अपने मन को ही बोध दिया है। मन ही मानव की विकृतियोंका केन्द्र है, उसी के कारण व्यक्ति संचालित रह कर व्यक्ता व्यक्त चेष्टाओंको व्यक्त करता है। मानव जीवन के उर्ध्वीकरण एवं अधःपतन का कारण भी वही है।

पाश्चात्त्य मनोवैज्ञानिकों की धारणा इस संदर्भ में भिन्न है। महामना फ्रॉयड ने मन के चेतन एवं अचेतन दो रूपों का स्वीकार किया है। फ्रॉयड का कथन है, कि अचेतन मन की शक्ति चैतन्य मन से विशेष हुआ करती है, क्योंकि अनेक इच्छाएँ इसी मन में दमित रूप में पडी रहती हैं। प्रसिद्ध मनोवैज्ञानिक एड्लर ने भी अचेतन

मन को विशेष महत्त्व दिया है। उसके अनुसार मन एवं शरीर का घनिष्ठ सम्बन्ध होता है।

सुप्रसिद्ध महाकवि प्रसादजी की धारणा भी भारतीय एवं पाश्चात्त्य मनोवैज्ञानिकों की विचारधारा का संयुक्त रूपमें अवलंबन करती है। वे भी मन को चेतन मानते हैं एवं वह अचेतनावस्था में नानाविध विकारों से युक्त रहता है ऐसा उनका मत है। सभी मनोविकारों का मूलसम्बन्ध मन से ही होता है। चिन्ता, हर्ष, विषाद, निर्वेद, लोभ, मोह, आनंद एवं क्रोध अनेक प्रकारों की मनोवृत्तियाँ होती हैं।

'कामायनी' हिन्दी का सर्वश्रेष्ठ महाकाव्य रूपक तत्त्व की दृष्टि से देखा जाय तो उसके नायक 'मनु' का सम्बन्ध मन से ही है। 'श्रद्धा' एवं 'इडा' का सम्बन्ध क्रमशः हृदय और बुद्धि से है। 'कामायनी' में प्रसादजी ने प्रारंभ में जलप्लावन की घब्बा के बाद मन अर्थात् मनु को हिमगिरि के उत्तुंग शिखर पर बैठा दिया। जहाँ वह अकेला है। अकेला मन हमेशा चिन्ता करता है। समर्थ रामदास स्वामी ने भी इसी हेतु मन को भक्तिपथ पर जाने का अनुरोध किया है। "मना सज्जना भक्ति-पंथेचि जावे। तरी श्रीहरि पाविजेतो स्वभावे" अकेले में मनु का मन जो चेतना शून्य होकर चिन्ता के भार से दबा हुआ था। प्रसादजी वर्णन करते हैं,

"ओ चिन्ता की पहली रेखा, अरी विश्व वन की व्याली,
ज्यालामुखी स्फोट के भीतर, प्रथम कम्पन्सी मतवाली।
ओ अभाव की चपल बालिके, री ललाट की खल लेखा,
हरीभरी-सी दौडधूप औ' जलमाया की चल रेखा॥"

चिन्ता ही व्यक्ति के समस्त दुःखों की माता है और इसी चिंता को बुद्धि, मनीषा, मति आधा आदि अनेक नाम कविने दिये हैं। ऐसी दुःखात्मक वृत्ति के शमन का उपाय मात्र विस्मृति है। अब सर्गांत में कवि प्रकृति परिवर्तन का वर्णन करके प्रभात की सुनहली घटाओं का वर्णन करता है। चिंता के बाद आशा का उदय हुआ।

द्वितीय सर्ग का नाम 'आशा' है, मनु में आशा का संचार होते ही मन में अहं भाव की उत्पत्ति हुई, जीवनमें नवचेतना का संचार हुआ। मैकडूगल के मतानुसार अहंभाव एक प्रकार की मूलप्रवृत्ति है, जो उल्लास एवं सवेग के रूप में प्रकट होती है। उसके साथ जिज्ञासा भी जो भी एक मूल प्रवृत्ति है, जो अज्ञात एवं नवीन वस्तु देखनेपर जागृत होती है।

मन के अंतर्गत रागात्मक भाव या अनादि वासना के जागृत होनेपर रागी मन हृदय का सम्पर्क करता है। जहाँ विश्वास उत्पन्न होता है। यह है तृतीय सर्ग 'श्रद्धा' जो हृदय का प्रतीक है। तब उसका सर्वस्व श्रद्धा से जुड जाता है। मनु का श्रद्धा से जुडना अर्थात् मन का विश्वास से एकत्व; हृदय से एकत्व है। और इसके सम्पर्क से

मनु अर्थात् मन का उर्ध्वीकरण होता है। मनोवृत्तियाँ उन्नति का ओर अग्रसर होती हैं। उन्नति के साथ मनु में काम उत्पन्न होता है।

'कामायनी' का चौथा सर्ग 'काम' है। काम न्यायदर्शनानुसार इच्छा ही है। मनोविज्ञान में उसे 'लिबिडो' कहा जाता है। 'काम' शब्द मात्र मनोविज्ञान के क्षेत्र का नहीं किंतु धर्मशास्त्र पुरुषार्थचतुष्टय एवं दर्शन का भी वह पारिभाषिक शब्द है। भारतीय मतानुसार 'काम' मन का मूलप्रवृत्ति है एवं सृष्टि के आद्यस्वरूप में उसी का अस्तित्व स्वीकारा गया है। गीता में धर्मानुकूल काम को ईश्वर का ही स्वरूप माना गया है। मनोविज्ञान में काम अपनी दृष्टिसे महत्त्वपूर्ण मनोवेग है। फ्रॉयड के मतानुसार काम का अर्थ व्यापक है, इसे वे प्रेम का पर्यायवाची मानते हैं। काम ही मानव जीवन को प्रमुख रूपमें प्रभावित करता है। उसका दमन अनेक विकृतियोंका कारण बनता है। 'कामायन' में मनुके काम का दमन अनेक बार किया। श्रद्धा वे अनेक बार समजाया, किन्तु मनु न समजा। तब मूलप्रवृत्तिजन्य काम स्वप्न रूप में मूर्तिमंत होता है। और काम के साथ रति अर्थात् वासना का उदय होता ही है।

'कामायनी' का पंचम सर्ग है 'वासना'। वासना को काम का व्यक्त रूप कहना युक्त होगा। मैकडूगल ने उसे काम का एक संवेग माना है। वह मन को उद्भ्रांत करने का कार्य करता है। उद्भ्रान्त मन श्रद्धासे अपने हृदय की शांति चाहता है। मन के आत्मसमर्पण कर देने की बातपर श्रद्धा अर्थात् हृदय में लज्जा का संचार होता है। फलस्वरूप बाह्यपरिवर्तन दिखाई देते हैं।

'कामायनी' का षष्ठ सर्ग है 'लज्जा' जो एक मनोभाव है। उत्तप्त वासना का शमन करने का कार्य उसका है। वासना के द्वारा विषयीप्रधान पक्ष का पुष्टिवर्धन होता है, और वासना का ही प्रकटीकरण लज्जा के रूप में होता है। लज्जा स्त्रियों का आभूषण है, जब मन अपने ही सुख का विचार करता है तब उसमें 'तमोगुण' की वृद्धि होती है। तमोगुण वेष्टित मन भ्रमित हो जाता है। यह भ्रमिष्ट मन संग्रह एवं आधिपत्य के भाव में आकर स्वयं के पतन का कारण बन जाता है।

भ्रमिष्ट मन को हृदय अर्थात् श्रद्धा कर्म करनेका उपदेश देती है। कविने यहाँ सप्तम सर्ग की योजना की है। मनु 'कर्म' के लिए यज्ञ करना सोचते है, और भ्रमिष्ट मन स्वस्वार्थ के कारण आकुलि एवं किलात के द्वारा प्रेरित होकर उन्मत्त बन बैठता है। क्षुद्र स्वार्थजन्य वृत्तियाँ ही आकुलि एवं किलात का रूप है। जो मन गुमराह करके पशुवध के लिए प्रेरित करते हैं। मनु का यज्ञ पूर्ण हुआ, किन्तु श्रद्धा आनंदित न हुई। भ्रमिष्ट मन के द्वारा किए कर्मों से हृदय कभी संतुष्ट नहीं होता।

श्रद्धा का विरक्त होना, और मनु का सोमरस पीना, श्रद्धा को मनाना किन्तु मनु के व्यवहार में अहिंसा नहीं; न मानवतावाद के प्रति कोई नया सर्जनात्मक दृष्टिकोण भी है। 'फिरभी श्रद्धा मनु के अनुनय का स्वीकार करके समझौता करती है। मनु

श्रद्धा से जीवन शिशु के पिता पद तक पहुँच गए। मनु उन्मत्त तक तो थेही शिशु की बात सुनकर उनमें ईर्ष्या भाव का उदय हुआ। मनोविज्ञान के अनुसार ईर्ष्या असहनशीलता का परिणाम है, इसमें मनुष्य का अहं केंद्रित हो जाता है। इसी वाक्य में जलन के कारण उत्पन्न होता है। फ्रायडने ईर्ष्या के मूलमें 'इडिपस' ग्रंथि तथा 'इलेक्ट्रा' ग्रंथि को स्वीकारा है। जिसमें विषम लिंग के प्रति आकर्षण और सम-लिंग के प्रति विकर्षण उत्पन्न होता है। 'कामायनी' में श्रद्धा को छोडकर मनु भाग निकले इसी अवस्था को पलायनावस्था हम कह सकती हैं। ईर्ष्या सर्ग अकालका आठवाँ सर्ग है।

नववे सर्ग में मनु अर्थात् मन श्रद्धा का परित्याग करके 'इडा' अर्थात् बुद्धि के पास चले गए। मन बुद्धि के कंट्रोल में जब आ जाता है, तब वह बद्ध हो जाता है। भ्रान्तचित्त मूढमन अंततः अधोगति को प्राप्त करता है। क्योंकि वही तो संघर्ष एवं मुक्ति का कारण है। अतः अधोगति प्राप्त मन में काम क्रोध एवं लोभ तीन मनोभाग जगते हैं। इनके चक्करमें न तो मन का उर्ध्वीकरण होता है न उसका परितुष्टि। ऐसी स्थिति में वह बुद्धि अर्थात् 'इडा' पर आधिपत्य जमाना चाहता है। जिसका परिणाम अशांति है। 'अशान्तस्य कुतः सुखम्' अशान्त मन सुखानुभव कैसे करेगा? जब मन शुद्ध से पराभूत होता है तब मनका आधिपत्य हर जाने से नेतृत्व विहित मन पुनः भटकने लगता है। अशांति की अवस्था में ही संघर्ष का निर्माण होता है। 'कामायनी' में सारस्वतनगर की प्रजा का विद्रोह मनोवैज्ञानिक दृष्टिकोण से सामूहिक जन आंदोलन मन का प्रतीक हो सकता है।

इसी तरफ श्रद्धा मनु से अलग होकर गुफा में अपने विरह के दिनों को व्यतीत करती है। विरह में क्षीणता, कातरना एवं संतप्तता का अनुभव होना भी मनोवैज्ञानिक दृष्टिकोण से योग्य ही है। वह अपने बिते दिनों की स्मृति में खो जाती है, तब श्रद्धा का शिशु माँ माँ करता उसके गोदमें आता है। इस क्रिया से श्रद्धा की विरह वेदना दुगुनी बढती है। तब श्रद्धा स्वप्न का अनुभव कला है। स्वप्न में मनु का दशा देखकर उसका कांप उठना और मनु व्यापक अनिष्ट अनेक शंकाओं का उभर आना भी मनोवैज्ञानिक सत्य के प्रति अंगुलिनिर्देश नहीं तो और क्या है? यहाँ दस सर्ग तक की कथा पूर्ण हो जाती है।

प्रत्येक युद्ध के पश्चात् जैसे स्वभाव शांति उपस्थित होती है वैसे मन महान् होने के बाद 'निर्वेध' उत्पन्न होता है। जो बारहवाँ सर्ग है। मैकडूगलके मतानुसार 'निर्वेद' का संबंध विकसित से होता है। विकसित अरुचि या घृणा नामक संवेग के कारण प्रदीप्त हो उठता है। यह बात सत्य है कि जो मन को रुचिकर नहीं लगता उसके प्रति अरुचि पैदा हो जाती है। मनु इडा के पुत्र के साथ संघर्षोपरान्न शोकग्रस्त हो उठता है। निर्वेद के अंतर्गत कभी पश्चात्ताप, वैराग्य एवं खेद का भाव जन्म लेता है।

और ऐसे समय में मनको यथोचित मार्गदर्शन प्राप्त हो जाय तो वह पुनः संभल जाता है। मनु का विरक्ति श्रद्धा से अनुरोध करती है कि मुझे कहीं दूर दूर ले जाओ 'इडा' के प्रति उनका मन घृणा भाव से भर उठता है। श्रद्धा के प्रति मनु को उस पश्चात्ताप होने लगा है और इसी पश्चात्ताप का प्रखर ज्वाला मनु को पुनः भगाती है। भटकता हुआ मन शांति के लिए मारा मारा फिरता है। किन्तु उसे शाश्वत शांति का कोई नहीं प्राप्त होता है?

मनः मर्कट है, यह कहा है यह उचित ही है। मनु की यात्रा पुनः प्रारंभ हो गई और छायानुवर्तित्व श्रद्धा, मानव एवं इडा पुनः उसे ढूंढने लगे। तेरहवा सर्ग 'दर्शन' है जहाँ मनु सरस्वती के किनारे श्रद्धा के द्वारा पुनः पाये गए। सरस्वती यह विमलमति का प्रतीक मैं मानता हूँ। "नहि ज्ञानेन सदृशं पवित्रं इह विद्यते" ज्ञान सा पवित्र यही कुछ नहीं! तब अपवित्र मन भी सरस्वती के किनारे पावित्र्य प्राप्त कर लेना है। और ऐसा अवस्थामें शमित मन दर्शन के लिए उत्सुक हो उठता है। अंततोगत्वा मन की प्रगाढ शक्तियाँ जागृत होकर दिव्य दर्शन के द्वारा रहस्य के पार द्वार सत्त्व-गुणमय संसार में रमण करने लगती है। तब इसे ज्ञानलोक कहते हैं। रहस्य के बाद भरासाक का अंत 'आनंद' सर्ग से होता है। मन के क्रमिक विकासका यह अंतिम सोपान है। तब मन ब्रह्ममय होकर तद्‌रूप हो जाता है जहाँ मैं मैं नहीं, तू तू ना रहे सभी भेदभाव खत्म हो जाते हैं, एकात्म रुध जाता है। प्रकृति के जडचेतन पदार्थ भी समान आनंद का अनुभव करते हैं।

निष्कर्षतः प्रसादजी भले मनोवैज्ञानिक न हो किन्तु 'कामायनी' में मानव मन के विकास का सोपान का चित्र उन्होंने जो व्यक्त किया है वह हिन्दी काव्यजगत् में अद्‌भुत है। हिन्दी जगत् का शायद यह पहला ही महाकाव्य है जहाँ मनस्तत्त्व का शास्त्रोक्त निरूपण प्रसादजी द्वारा प्राप्त होता है।

मंडळ–वृत्त

विशेष कार्यक्रम

(१) " ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेची छोटी छोटी ताकद एकत्रित करून त्यांच्या उपक्रमशीलतेला वाव देऊन शोषणरहित अर्थव्यवस्थेकडे नेणारी महाराष्ट्रातील सहकार चळवळ जगली पाहिजे—वाढली पाहिजे," असे कळकळीचे उद्गार इतिहासाचार्य राजवाडे यांच्या ६१व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या " महाराष्ट्रातील सहकार चळवळ " या विषयाचे अनुषंगे सहकारमहर्षी शहाद्याचे आमदार पी. के. अण्णा पाटील यांनी प्रकट केले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. व्यं. सु. पाटणकर होते.

(२) दि. १२ फेब्रुवारी १९८८ रोजी राजवाडे संशोधन मंडळाच्या "हीरक महोत्सवी " अंकाचा प्रकाशन समारंभ पुणे विद्यापीठाचे विद्यमान उपकुलगुरू डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांच्या शुभहस्ते पार पडला. धुळे नगरवासीयांनी इतिहासाचार्य राजवाडे यांच्या चिरंजीवी स्मारक उभारणीबाबत दाखवलेली गुणग्राहकता डॉ. नवलगुंदकरांना कौतुकास्पद वाटली. विज्ञान युगातही इतिहासाप्रमाणे समाजशास्त्र व भाषाशास्त्र ह्या विषयांचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे हे त्यांनी प्रतिपादन केले. राजवाडे संशोधन मंडळाला पुणे विद्यापीठाचे संशोधन केंद्र म्हणून अनुमती देण्याबाबत प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन डॉ. नवलगुंदकरांनी दिले.

(३) दि. १९ फेब्रुवारी १९८८ रोजी " नवरस रागमाला " या मंडळाच्या २४ व्या प्रकाशनाचा प्रकाशन समारंभ धुळे जिल्ह्याचे लोकप्रिय जिल्हाधिकारी मा. श्री. अभय बोरवणकर यांच्या शुभहस्ते पार पडला. आपल्या अध्यक्षीय भाषणात सध्याच्या जातीय तणावाच्या कालात नवरस रागमालेसारखी पुस्तके मार्गदर्शक ठरतील असे त्यांनी सांगितले.

समारंभप्रसंगी पुस्तकाचे संपादन केलेले मराठवाडा विद्यापीठाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. पंढरीनाथ रानडे सपत्निक आवर्जून उपस्थित होते. पुस्तकाची पार्श्वभूमी

विशद करताना डॉ. रानडे म्हणाले, ' ' नवरस रागमाला ' हा सोळाव्या शतकातील अतिशय महत्त्वपूर्ण ग्रंथ असून विजापूरचा बादशहा इब्राहिम आदिलशहा दुसरा याने स्वतः तो लिहिला आहे. संगीतावरील या ग्रंथात सरस्वती, गणेश यासारख्या हिंदू दैवतांची स्तवने या ग्रंथात आढळतात. "

थोरामोठ्यांच्या गाठीभेटी

स्वामी समर्थ पीठप्रमुख मा. श्री. मोरे दादा, धुळे जिल्हा शल्य चिकित्सक मा. डॉ. अमृतसिंग वसावे, डॉ. य. दि. फडके, डॉ. ग. रा. कामत, डॉ माधवराव कंटक, बिहारचे माजी आयुक्त श्री. कुंटे, नाट्य-समीक्षिका श्रीमती सुलभाताई देशपांडे, मिरज येथील उद्योगपती श्री. मराठे.

डॉ. य. दि. फडके यांनी मंडळातील "लोकहितवादींच्या कागदपत्रातील" तर डॉ. कंटक यांनी पुरंदरे दप्तरातील कागदपत्रांचा अभ्यास केला.

संस्थात्मक भेटी—जिजामाता कन्याशाळा, धुळे

शासकीय अध्यापक विद्यालय, धुळे

अभय अध्यापक विद्यालय, धुळे

शिक्षण प्रशिक्षण वर्ग (नगरपरिषद प्रशाला धुळे, न्यू सिटी स्कूल धुळे)

अन्यविशेष—वस्तुसंग्रहालयातील शोकेसेस उभारणीचे काम बडोद्याचे प्रा. डॉ. व्ही. एच. बेडेकर यांचे मार्गदर्शनानुसार पूर्ण होत आले असून कागदपत्रे, वस्तू व पेंटिंग्जची मांडणी विविध दालनांत नजीकच्या काळात होणार आहे.

" महानुभाव वाङ्मयावर " शिरूर कॉलेजमध्ये संशोधन प्रकल्प – विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता

शिरूर येथील श्री. चां. ता. बोरा महाविद्यालयातील प्राध्यापक रमेश आवलगावकर यांना विश्वविद्यालय अनुदान आयोगातर्फे नॅशनल करियर अवॉर्ड मिळविण्याचा बहुमान प्राप्त झाला आहे. या संशोधन प्रकल्पासाठी ३॥ लाख रुपये मंजूर झाले आहेत. आगामी तीन वर्षांत " महानुभाव वाङ्मयाचा भारताच्या मध्ययुगीन इतिहासावरील प्रभाव " या प्रकल्पाचे संशोधनकार्य शिरूर कॉलेजमध्ये सुरू होत आहे. यासाठी डॉ. आवलगावकर हे संशोधक प्राध्यापक म्हणून राहतील. अन्य ३ कनिष्ठ संशोधक या प्रकल्पात घेतले जातील.

महानुभाव पंथाचे अगणित वाङ्मय अप्रकाशित स्वरूपात भारतभर महानुभाव पंथाच्या विविध मठ मंदिरांमध्ये विखुरलेले आहे. एव्हाना जे वाङ्मय प्रकाशित झाले ते अत्यंत अल्प असून अप्रकाशित वाङ्मयाचा शोध घेऊन त्याचा ऐतिहासिक, सांस्कृतिक दृष्टीने अभ्यास, संशोधन होणे काळाची गरज आहे. विशिष्ट लिप्यांमध्ये बंदिस्त झाल्यामुळे हे साहित्य अभ्यासकांसमोर येऊ शकले नाही. विशेष परंपरागत धोरणांमुळे ते त्याच अवस्थेत राहिले तथापि त्यावर इतर संत वाङ्मयाप्रमाणे कोठलेच बाह्य संस्कार झालेले नाहीत. त्यामुळे महानुभावांचे साहित्य आपल्याला यथातथ्य स्वरूपात पाहावयास मिळते. या अप्रकाशित वाङ्मयाचा शोध घेऊन त्यातून तत्कालीन ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक बाबींवर फार मोठा प्रकाश पडू शकतो.

संशोधन प्रकल्पाचे महत्त्व

या साहित्याचे आजवर झालेले संशोधन वा अभ्यास महानुभावांच्या मूळ संकल्पना-

वर कितपत आधारित आहे हेही या प्रकल्पाच्या माध्यमातून अभ्यासिता येणार आहे. भारतभर असलेल्या मठ मंदिरात जाऊन महानुभावांच्या प्रकाशित आणि अधिकतर अप्रकाशित अज्ञात असलेल्या साहित्याचा शिस्तबद्ध अभ्यास, संशोधन करून मध्ययुगीन काळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहासाची पुनर्रचना करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश राहील. या अभ्यासामुळे समकालीन संतवाङ्मयाची ऐतिहासिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी, संतांच्या वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, महानुभावांच्या कार्याची सामाजिक निष्पत्ती हे पडताळून पाहिले जाईल. तथा महानुभावांच्या वाङ्मयीन, सांस्कृतिक इतिहासाचेही पुनरवलोकन होईल. या पूर्वी या संदर्भात अशा प्रकारचा सर्वांगीण अभ्यास झालेला नव्हता. रमेश आवलगावकरांच्या या प्रबंधामुळे मध्ययुगीन इतिहासावर फार मोठा प्रकाश पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रमेश आवलगावकर हे या महाविद्यालयातील पद्व्युत्तर मराठी विभागात अध्यापनाचे काम करीत असून या पूर्व प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ‘ केशिराज व्यास : व्यक्ती आणि वाङ्मय ’ या ग्रंथास १९८५ सालचा विश्वभारती पुरस्कारही मिळालेला होता. अनेक नियतकालिकांतून त्यांचे संशोधनपर निबंध प्रसिद्ध झाले असून ते मान्यता पावलेले आहेत. “ शोध–संवाद ” गीता–दर्पण, स्मृतिस्थळ इत्यादी पुस्तके-संपादने प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. संशोधक त्रैमासिकातून त्यांचे लेख प्रसिद्ध होत असतात.

कॉलेजच्या मराठी विभागाच्या या संशोधन प्रकल्पास विभागाचे प्रमुख प्रा. सु. द. वैद्य यांचे मार्गदर्शन राहणार असून त्यांचे समवेत महानुभाव वाङ्मयावरील अन्य संशोधक व तज्ज्ञ व्यक्तींना पाचारण करण्यात येणार आहे.

विक्रीसाठी ठेवलेले इतर ग्रंथ

(१) छ. शिवाजी महाराजांची पत्रे (प्र. न. देशपांडे) पृ. ३०० ६५ रु.

विशेष सवलत : वरील १४ पुस्तकांचा संच किंमत रुपये ४५६ चा केवळ रुपये ३५० ला मिळेल. २ अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमिशन. काही ग्रंथांच्या प्रती अगदीच मर्यादित. टपाल खर्च वेगळा लागेल.

संशोधक त्रैमासिक : इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली ५६ वर्षे प्रकाशित होत आहे. वार्षिक वर्गणी फक्त रु. २५/—प्रत्येक अंक किंमत रु. ७/— ५६ वर्षांतील उपलब्ध असलेल्या सर्व अंकांचा संच केवळ रु. ३५०/—त उपलब्ध (त्यात सुवर्ण महोत्सवी अंक रु. ४०/— योग चिंतामणी रु. ४१. आज्ञा पत्र रु. २०/— हीरक महोत्सवी अंक रु. ४५/— समाविष्ट).

चिटणीस.

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१